RNI NO. MAHMAR/25/A3029

लातूर

वर्ष : ७ वे, अंक नं. : ५१

दि. १३ जून २०२६, वार : शनिवार

पाने : ४, किंमत : स्वागत मूल्य २ रू.

दैनिक

# महावृत्त

E-mail : dainikmhavratt@gmail.com

संपादक : अशोक हनवते, मो. 9421094991, 7264079990

# ‘अल निनो’ सक्रिय; दुष्काळाच्या संकटाची चाहूल

## गत ५० वर्षांतील धोकादायक अल निनो; हवामान चक्रात होणार मोठे फेरबदल

**पुणे/प्रतिनिधी :** प्रशांत महासागरात अखेर ‘अल निनो’ सक्रिय झाला आहे. गेल्या ५० वर्षांतील सर्वाधिक धोकादायक ‘अल निनो’ ठरणार असल्याचा अंदाज भारतातील आणि विदेशी हवामान संस्थांनी व्यक्त केला असून निम्मा भारत दुष्काळाच्या छायेत येऊ शकतो. असे भाकीत वर्तवले आहे. शास्त्रज्ञांनी १८७१ ते २०२२ या १५२ वर्षांतील १६ अल निनो वर्षांचा अभ्यास करून हा निष्कर्ष काढला आहे. त्यामुळे दुष्काळाच्या संकटाची चाहूल लागली आहे. शुक्रवारी सक्रिय झालेल्या अल निनोमुळे जगाच्या हवामान चक्रात मोठे फेरबदल होण्याची भीतीही व्यक्त करण्यात आली आहे.

यंदा महाराष्ट्रासह देशा सुमारे साठ टक्के पाऊस कमी होऊ शकतो, असा अंदाज अमेरिकेतील एनओएए (नॅशनल ओशिएनिक अँड टमॉस्फिअरिक डमिनिस्ट्रेशन) या संस्थेने दिला आहे, तर दुसऱ्या बाजूला भारतीय हवामान शास्त्र विभागाने यंदा पाऊस कमी असला तरी तो ८४ ते ९० टक्के पडेल, असा दावा केला आहे. दरम्यान, मान्सून मध्य महाराष्ट्रातील सोलापूर-बारामती मार्गावरच गत सात दिवसांपासून अडखळल्याने ऐन जून महिन्यात विदर्भ अन्‍ मराठवाड्यात उष्णतेची लाट तीव्र झाली आहे.

अमेरिकन संस्थेने दिलेल्या अंदाजात भारतात जून, जुलै आणि ऑगस्टपर्यंत अल निनोचा प्रभाव राहणार आहे. त्यामुळे ऐन मान्सूनचे महिने कमी पावसाचे राहणार आहेत. सुमारे ६० टक्के कमी पाऊस राहील, तर दुसऱ्या बाजूला भारतीय हवामानशास्त्र विभागाने म्हटले आहे की, भारतात ८४ ते ९० टक्के इतका मान्सून राहणार आहे. हा पाऊस सरासरीपेक्षा १५ ते २० टक्के कमी राहिल. या दोन्ही संस्थांचे अंदाज कमी पावसाचे आहेत. त्याची प्रचिती जूनचा पहिला आठवडा संपताच येत आहे. १२ जून ओलांडून गेला तरी राज्यात पाऊस नाही. त्यामुळे शेतकऱ्यांसह सामान्य नागरिकही धास्तावला आहे.

सरकारच्या सल्ल्याशिवाय पेरणी करू नका : मुख्यमंत्री

राज्य प्रशासनाला संभाव्य कमी पावसासाठी आधीपासूनच तयारी करण्याचे निर्देश दिले आहेत. एल निनोमुळे पावसात खंड पडू शकतो. त्यामुळे शेतकऱ्यांनी पेरणीची घाई करू नये. कृषी विभागाच्या सल्ल्यानेच पेरणी करावी. अन्यथा गंभीर परिस्थिती निर्माण होऊ शकते, अशी माहिती मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी शुक्रवारी प्रसारमाध्यमांशी बोलताना दिली.

कोयना धरणाची पाणी साठवण क्षमता १०५ टीएमसी असून सध्या फक्त ९.३१ टीएमसी पाणी म्हणजे ९.७९ टक्के पाणी साठा शिल्लक आहे. कोयना वीज प्रकल्पातील वीजनिर्मितीचा टप्पा ३ व ४ पाण्याअभावी ठप्प झाला आहे.

असे होतील हवामानावर परिणाम

१. काही भागांत अतिवृष्टी व पूर : दक्षिण अमेरिकेतील काही देश आणि अमेरिकेच्या दक्षिणेकडील राज्यांमध्ये नेहमीपेक्षा जास्त पाऊस आणि पुराचा धोका वाढेल.



२. भीषण दुष्काळ आणि उष्णतेची लाट : ऑस्ट्रेलिया, आशिया खंडातील काही भाग (ज्यात भारताचाही समावेश असू शकतो) आणि आफ्रिकेत मान्सून कमकुवत होऊन भीषण दुष्काळ, पाणीटंचाई आणि जंगलातील वणवे लागण्याचा धोका वाढेल.

३. समुद्री जीवसृष्टीला धोका: महासागराचे तापमान वाढल्याने माशांचे प्रमाण कमी होईल आणि समुद्री जीवसृष्टीच्या अन्नसाखळीला मोठा फटका बसेल.

# ४० लाख शेतकऱ्यांना मिळणार विनाअट कर्जमाफी : मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

**मुंबई/प्रतिनिधी :** कोणत्याही निवडणुका समोर नसताना राज्य सरकारने कर्जमाफी केली आहे. या कर्जमाफीत कोणत्याही अटी आणि शर्ती टाकलेल्या नाहीत. तब्बल ४० लाखांहून अधिक शेतकऱ्यांना ही कर्जमाफी मिळणार असल्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी शुक्रवारी सांगितले. राज्यातील बँकिंग व्यवस्था जिल्हा सहकारी बँका टिकल्या पाहिजेत या उद्देशाने केवळ वारंवार कर्जमाफीचा लाभ घेणाऱ्यांना विशिष्ट मर्यादेत कर्जमाफीचा निर्णय केला असून उर्वरित रक्कम त्यांना भरायची असल्याचे फडणवीस यांनी केले.



पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखालील एनडीए सरकारला यशस्वी १२ वर्षे पूर्ण झाल्याच्या निमित्ताने मुंबईत आयोजित विशेष पत्रकार परिषदेत फडणवीस बोलत होते. यावेळी राज्य सरकारने जाहीर केलेली कर्जमाफी, स्वामिनाथन आयोगाच्या शिफारशींची अंमलबजावणी आदी प्रश्नांवर फडणवीस यांनी सविस्तर उत्तरे दिली. विरोधकांनी मागणी करण्यापूर्वीच आम्ही हा निर्णय घेतला. आमच्या डोळ्यासमोर राजकीय हेतू नाही, आपल्या शेतकऱ्याला कसे सक्षम करता येईल हाच विचार यामागे आहे. जर राजकीय हेतू असता तर आम्ही २०२९ च्या निवडणुका लक्षात घेऊन २०२८ च्या डिसेंबरमध्ये कर्जमाफी केली असती, असेही ते म्हणाले.

**स्वामिनाथन आयोग लागू केला**

मोदी सरकारनेच स्वामिनाथन आयोगावर निर्णय केले. यासंदर्भात स्वतः स्वामिनाथन यांनी लेख लिहून आपला अहवाल लागू असल्याचे म्हटले आहे. आता या विषयात त्यांच्याशिवाय अधिकारवाणीने बोलणारी दुसरी व्यक्ती कोण असेल, असा प्रश्नही फडणवीस यांनी केला. आता हा अहवाल लागू झाला असून परिणाम दिसायला आणखी काही वर्षे द्यावी लागतील. शेतीसमोरील आव्हाने कमी नाहीत. आता निसर्गाचे एक मोठे आव्हान तयार होत आहे. त्यादृष्टीने शेती क्षेत्राला सक्षम करावे लागणार असल्याचेही फडणवीस म्हणाले. शेतकऱ्यांचे उत्पन्न दुप्पट करण्याच्या दिशेने अनेक योजना राबविल्या जात आहेत. अनेकांना त्याचा लाभही होत आहे. काहीजणांना शेतीत परिवर्तन करून शेतमाल निर्यात करत शेती फायद्यात आणत आहेत. मात्र, जो गरीब आणि छोटा शेतकरी आहे त्याला आणखी मदत द्यावी लागणार आहे. त्यादृष्टीने सरकार ती मदत करत त्याला सक्षम बनवेल, असे फडणवीस यांनी स्पष्ट केले.

राज्यातील बँकिंग व्यवस्था, विशेषतः जिल्हा सहकारी बँका टिकल्या पाहिजेत, या उद्देशाने या कर्जमाफीत केवळ एकच तांत्रिक अट घालण्यात आली आहे. ज्यांना वारंवार कर्जमाफी मिळाली आहे, त्यांच्यासाठी एका निश्र्चित रकमेपर्यंत कर्ज माफ केले जाईल व उर्वरित रक्कम त्यांना भरावी लागेल. अशी अट नसेल तर बँकिंग व्यवस्थाच उद्ध्वस्त होईल, असेही फडणवीस म्हणाले.

**अडचणी सोडविण्यासाठी मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्र्यांची समिती**

साधारणपणे ४० लाखांहून अधिक शेतकरी असे आहेत, ज्यांना विनाअट कर्जमाफीचा फायदा मिळणार आहे. दरम्यान, या कर्जमाफीसंदर्भात आम्ही एक उपसमिती नेमली आहे. यामध्ये माझ्यासह दोन्ही उपमुख्यमंत्री आणि अन्य काही मंत्र्यांचा समावेश करण्यात आला आहे. कर्जमाफी लागू करताना काही अडचणी आल्यास त्या त्यावेळी दूर करण्याची जबाबदारी या समितीला देण्यात आल्याचे मुख्यमंत्र्यांनी सांगितले.

## शेगावच्या प्रसिद्ध ‘शर्मा कचोरी’ सेंटरवर अन्न व औषध प्रशासनाचा छापा

बुलढाणा : जिल्ह्यातील शेगाव येथे असलेल्या प्रसिद्ध तीरथराम करमचंद शर्मा कचोरी सेंटरवर बुलढाणा अन्न आणि औषध प्रशासन विभागाने अचानक छापा टाकला. कचोरी बनवण्यासाठी वापरण्यात येणाऱ्या विविध कच्च्या मालाचे नमुने तपासणीसाठी घेण्यात आले आहेत. भेसळयुक्त पदार्थ आढळल्यास संबंधित प्रतिष्ठानावर कठोर कारवाई करण्यात येईल, असं प्रशासनाकडून स्पष्ट करण्यात आलं आहे. अन्न आणि औषध प्रशासन आयुक्त तुकाराम मुंढे यांच्या निर्देशानुसार राज्यभरात भेसळयुक्त खाद्यपदार्थाविरुद्ध विशेष मोहीम राबवण्यात येत आहे. या मोहिमेअंतर्गत जिल्ह्यातील प्रसिद्ध खाद्य केंद्रांची तपासणी सुरू आहे. शेगाव हे महाराष्ट्रातील एक प्रमुख तीर्थक्षेत्र आहे. दरवर्षी लाखो भाविक शेगावला येतात आणि येथील प्रसिद्ध कचोरीचा आस्वाद घेतात. ’शेगावची कचोरी’ ही ओळख जवळपास प्रत्येक भाविक आणि पर्यटकांना आहे. मात्र या कचोरीची गुणवत्ता आणि त्यात वापरल्या जाणाऱ्या कच्च्या मालाची शुद्धता याबाबत शंका उपस्थित झाल्याने प्रशासनाने अचानक छापा टाकला. अन्न व औषध प्रशासनाचे अधिकारी गुलाबसिंग वसावे यांच्या नेतृत्वाखालील पथकानं सेंटरवर छापा टाकला. त्यांनी कचोरी बनवण्यासाठी वापरल्या जाणाऱ्या मैदा, डाळ, तेल, मसाले, तूप आणि इतर आवश्यक साहित्याचे नमुने घेतले.

## माझी मुलगी परत येणार नाही, पण अपघाताचे सत्य तरी सांगा : मैथिली पाटीलच्या आईचे आर्जव

**नवी मुंबई/प्रतिनिधी :** अहमदाबाद विमान अपघातात मृत्यू झालेली माझी मुलगी परत येणार नाही, पण अपघाताचं सत्य तरी सांगा, असं आर्जव हवाई सुंदरी मैथिली पाटीलच्या आई आणि मामानं सरकारकडं केलं आहे. आज अहमदाबाद विमान अपघाताला वर्ष पूर्ण झालं आहे. आज मैथिलीचं वर्षश्राद्ध करण्यात आलं. मात्र अपघात कसा झाला होता, याचा चौकशी अहवाल अद्यापही समोर न आल्यानं विमान अपघातात मृत्यू झालेल्या हवाई सुंदरी मैथिली पाटील हिच्या कुटुंबीयांनी नाराजी व्यक्त केली आहे. अहमदाबाद विमान अपघाताचा घटनाक्रम : १२ जून रोजी अहमदाबादहून लंडनला जाणाऱ्या एअर इंडियाच्या फ्लाईट १७१ या बोईंग ७८७-८ विमानाच्या उड्डाणानंतर अवघ्या ३२ सेकंदात भीषण अपघात झाला. विमान मेघानीनगर परिसरातील बी जे मेडिकल कॉलेजच्या वसतिगृहावर कोसळलं. या अपघातात २४२ प्रवाशांपैकी २४१ प्रवासी, १२ कर्मचारी आणि जमिनीवरील १९ जण असे एकूण २६० लोक मृत्यू झाले, तर केवळ एकच प्रवासी बचावला होता.

चौकशी अहवाल जाहीर न झाल्यानं नाराजी : एअर इंडियाच्या एआय-१७१ विमान अपघाताला एक वर्ष पूर्ण होऊनही चौकशी अहवाल जाहीर न झाल्यानं मृतांच्या कुटुंबीयांमध्ये नाराजी आहे. या अपघातात मृत्यू झालेल्या हवाई सुंदरी मैथिली पाटीलच्या कुटुंबीयांनी सत्य समोर आणण्याची मागणी केली आहे. विमान कोसळून २६० जणांचा मृत्यू झाला होता. या अपघातात उरण तालुक्यातील न्हावा गावची कन्या आणि एअर इंडियाची हवाई सुंदरी मैथिली पाटील हिचाही मृत्यू झाला होता. दुर्घटनेला एक वर्ष पूर्ण होऊनही अंतिम चौकशी अहवाल समोर आलेला नाही. त्याच बरोबर मैथिली पाटील हिच्या बहीण किंवा भावाला सरकारी नोकरी द्यावी, अशी मागणी तिच्या नातेवाईकांनी करण्यात आली आहे.

## महात्मा फुले मागासवर्ग विकास महामंडळाच्या विविध कर्ज आणि अनुदान योजनांसाठी ऑनलाईन अर्ज करण्याचे आवाहन

**लातूर/प्रतिनिधी :** महात्मा फुले मागासवर्ग विकास महामंडळ मर्यादित, जिल्हा कार्यालय लातूर यांच्या वतीने सन २०२६-२७ या आर्थिक वर्षासाठी ५० टक्के अनुदान योजनेअंतर्गत ३५, बीजभांडवल योजनेअंतर्गत ३५ आणि थेट कर्ज योजनेअंतर्गत ७० लाभार्थ्यांचे उद्दिष्ट प्राप्त झाले असून, या योजनांचा लाभ घेण्यासाठी अनुसूचित जाती व नवबौद्ध समाजातील (मांग, मातंग, चांभार व खाटीक वगळून) गरजू लाभार्थ्यांकडून https://mahadisha.mpbcdc.in या संकेतस्थळावर ऑनलाईन अर्ज मागविण्यात येत आहेत.

यासाठी लाभार्थ्यांची वयोमर्यादा १८ ते ५० वर्षे असणे अनिवार्य असून, ऑनलाईन अर्ज करताना जातीचा व उत्पन्नाचा मूळ दाखला, रहिवासी प्रमाणपत्र, रेशनकार्डची झेरॉक्स प्रत, आधारकार्ड, पॅनकार्ड, मतदान ओळखपत्र, आधार लिंक असलेल्या बँकेच्या पासबुकची झेरॉक्स, टी.सी. व मार्क मेमोसारखी शैक्षणिक कागदपत्रे, व्यवसायाचे कोटेशन, व्यवसायाच्या जागेचा पुरावा, उद्यम आधार, शॉप ॲक्ट, संबंधित व्यवसायाचे प्रशिक्षण किंवा अनुभव प्रमाणपत्र आणि दोन पासपोर्ट साईझ फोटो इत्यादी कागदपत्रांची प्रामुख्याने आवश्यकता आहे.

संकेतस्थळावर यशस्वीरित्या ऑनलाईन अर्ज भरल्यानंतर, त्या अर्जाच्या दोन प्रती शिवनेरी गेट समोरील जुनी डालडा फॅक्टरी येथील भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्याय भवनाच्या तळमजल्यावर असलेल्या महात्मा फुले मागासवर्ग विकास महामंडळाच्या कार्यालयात प्रत्यक्ष जमा करणे आवश्यक आहे. या योजनेची सविस्तर माहिती पोर्टलवर उपलब्ध करून देण्यात आली आहे. जिल्ह्यातील जास्तीत जास्त गरजू लाभार्थ्यांनी वेळेत ऑनलाईन अर्ज करून या संधीचा लाभ घ्यावा, असे आवाहन महामंडळाचे लातूर जिल्हा व्यवस्थापक यांनी केले आहे.

## हिंदू खाटीक समाजासाठी सुवर्णसंधी; विविध कर्ज व अनुदान योजनांसाठी अर्ज करण्याचे आवाहन

**लातूर/प्रतिनिधी :** हिंदू खाटीक समाज आर्थिक विकास महामंडळ मर्यादित (महात्मा फुले मागासवर्ग विकास महामंडळ मर्यादित यांची उपकंपनी) लातूर जिल्हा कार्यालयामार्फत सन २०२६-२०२७ या आर्थिक वर्षासाठी विविध कर्ज आणि अनुदान योजना राबविण्यात येणार असून, या योजनांसाठी मुख्यालयाकडून उद्दिष्ट प्राप्त झाले आहे.

या अंतर्गत अनुदान योजनेसाठी ०५, बीजभांडवल योजनेसाठी ०५, थेट कर्ज योजनेसाठी ०६, एनएसएफडीसी टर्म लोनसाठी ०५, एनएसएफडीसी सूक्ष्म पतपुरवठ्यासाठी ०१ आणि एनएसएफडीसी उच्च शैक्षणिक कर्ज योजनेसाठी ०१ असे उद्दिष्ट प्राप्त झाले असून, अनुसूचित जातीतील हिंदू खाटीक समाजातील पात्र लाभार्थ्यांकडून अर्ज मागविण्यात येत आहेत.

योजनेचा लाभ घेण्यासाठी अर्जदाराचे वय १८ ते ५० वर्षे असणे आवश्यक आहे. अर्जासोबत जातीचा व उत्पन्नाचा मूळ दाखला, रेशनकार्ड, आधारकार्ड, पॅनकार्ड आणि मतदान ओळखपत्राची झेरॉक्स प्रत, रहिवासी प्रमाणपत्र, व्यवसायाचे कोटेशन, व्यवसायाच्या जागेचा पुरावा, आधार लिंक असलेल्या बँकेच्या पासबुकची झेरॉक्स प्रत, उद्यम आधार, टी.सी. व मार्क मेमोसारखी शैक्षणिक कागदपत्रे, संबंधित व्यवसायाचे प्रशिक्षण व अनुभव प्रमाणपत्र, व्यवसाय परवाना (शॉप ॲक्ट) आणि दोन पासपोर्ट आकाराचे फोटो जोडणे अनिवार्य आहे. इच्छुक व पात्र लाभार्थ्यांनी अर्ज करण्यासाठी किंवा अधिक माहितीसाठी महात्मा फुले मागासवर्ग विकास महामंडळ मर्यादित, भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्याय भवन, तळमजला, जुनी डालडा फॅक्टरी, शिवनेरी गेट समोर, लातूर येथे प्रत्यक्ष संपर्क साधावा. लातूर जिल्ह्यातील अनुसूचित जातीतील हिंदू खाटीक समाजातील जास्तीत जास्त लाभार्थ्यांनी या कर्ज आणि अनुदान योजनांचा लाभ घ्यावा, असे आवाहन हिंदू खाटीक समाज आर्थिक विकास महामंडळ मर्यादित, लातूरचे जिल्हा व्यवस्थापक यांनी केले आहे.

## कोल्हापूरच्या पठ्ठ्याचा नादच खुळा; दोन जुन्या सायकली अन् भंगारातील इंजिनपासून बनवली दौडणारी दुचाकी

**कोल्हापूर/प्रतिनिधी :** जिल्ह्यातील एका गावातील केवळ १४ वर्षाचा आणि इयत्ता आठवीत शिक्षण घेणारा विद्यार्थी समर्थ शिवम पाटील. यानं दोन जुन्या सायकल आणि भंगारातील दुचाकीचं इंजिन वापरून स्वत: एक हटके दुचाकी बनवली आहे. सध्या त्याची दुचाकी गावातील रस्त्यांवर धावत आहे. एप्रिलच्या शेवटच्या आठवड्यात सुरू झालेल्या त्याच्या प्रयोगाला साधारण एक महिन्यानंतर आता यश आलं आहे. त्याच्या या प्रयोगासाठी खर्चही अत्यल्प आला. बहुतेक साहित्य त्यानं घरातून, जवळचा जुना बाजार आणि गॅरेजमधून मिळवलं. आता त्याच्या धावणाऱ्या जुगाडू दुचाकीमुळं समर्थ पाटील सध्या सर्वत्र चर्चेचा विषय बनला आहे.

# लातूरच्या विकासासाठी नगरसेवकांचा महापौरांना घेराव

## विरोधी पक्षनेते देविदास काळे यांच्या नेतृत्वात भाजपा आक्रमक

**लातूर/प्रतिनिधी :** महानगरपालिकेत सत्तेत येऊन तीन महिन्यांपेक्षा अधिकचा काळ लोटला असला तरी अद्यापपर्यंत सत्ताधारी काँग्रेसकडून शहराच्या विकासाला गती देणारे कोणतेच ठोस निर्णय झालेले नाहीत. विशेष म्हणजे सत्ताधायांचा प्रशासनावर अंकुश नसल्यामुळे अधिकायांचीही मनमानी वाढलेली आहे. यामुळे शहराचा विकास रखडला असून लातूरची जनता सत्ताधारी आणि प्रशासनाच्या भोवयात भरडली जात आहे. यामुळेच लातूरच्या विकासाला गती मिळावी याकरिता विरोधी पक्षनेते देविदास काळे यांच्या नेतृत्वात भाजपा नगरसेवकांना आक्रमक भूमिका घेत महापौरांना घेराव घातला होता. शहरातील विकासकामे मार्गी न लागल्यास आगामी काळात अधिक आक्रमक भूमिका घेण्यात येईल, असा इशारा विरोधी पक्षनेते देविदास काळे यांनी दिला.



महानगरपालिकेच्या निवडणुकीत काँग्रेस पक्षाने अनेक आश्वासने देत मनपाची सत्ता हस्तगत केली. मात्र, सत्तेत येवून तीन महिन्यापेक्षा अधिकचा काळ लोटला गेला असला तरी अद्यापपर्यंत सत्ताधारी काँग्रेसने विकास कामांबाबत कोणतीही ठोस भूमिका किंवा निर्णय घेतले नाहीत. याउलट सुरु असलेल्या विकासकामांना स्थगिती देत शहराच्या विकासात खोडा घातलेला आहे. सत्ताधायांना लातूरचे प्रश्न दिसत नसल्याने शहरातील नागरिकांना नागरी सुविधा मिळणेही दुरापास्त होत आहे. जलाशयात मुबलक पाणीसाठा असूनही लातूरकरांना वेळेवर आणि स्वच्छ पाणीपुरवठा होत नाही. शहरातील वाहतूक कोंडी सोडविण्याचे नियोजन केवळ कागदावरच होत असून प्रत्यक्षात त्याची अंमलबजावणी होत नाही. त्यामुळे शहरात सर्वत्र वाहतूकीचीकोंडी होवून वाहनधारक व नागरिकांना याचा त्रास सहन करावा लागत आहे. मोकाट कुत्र्यांनी एका तरूणाचा बळी घेतला तरी अद्यापर्यंत मोकाट कुत्र्यांसह जनावरांचा बंदोबस्त करण्यात प्रशासन व सत्ताधायांना अपयश आले आहे. पावसाळा तोंडावर आलेलाअसतानाही शहरातील रस्त्यांची दुरुस्ती झालेली नसून खड्ड्यात रस्ता की रस्त्यात खड्डे अशी अवस्था झालेली आहे. नगरसेवकांकडून खड्डे बुजविण्यासाठी मुरुमाची मागणी होत असून तीही पूर्ण होत नाही.

मनपातील प्रशासक राज जावून लोकनियुक्त सभागृहात अस्तित्वात आले असलेतरी अद्यापपर्यंत अधिकायांची मनमानी सुरुच आहे. सत्ताधायांचा प्रशासनावर अंकुश नसल्यामुळे अधिकारी त्यांच्या मनात येतील तीच कामे मार्गी लावत नगरसेवकांच्या सूचनांना किंवा मागणींना केराची टोपली दाखवत आहेत. या सर्व बाबींवर सर्वसामान्य लातूरकर भरडला जात असून शहरातील विकास कामेही ठप्प आहेत. त्यामुळेच विरोधी पक्षनेते देविदास काळे यांच्या नेतृत्वात भाजपा नगरसेवकांनी महापौरांना घेराव घालत त्यांना जाब विचारला. लवकरात लवकर विकास कामेमार्गी न लागल्यास यापेक्षाही तिव्र आंदोलन करण्याचा इशारा देविदास काळे यांनी यावेळी दिला. याप्रसंगी भाजपाचे सर्व नगरसेवक व पदाधिकारी उपस्थित होते.

## संपादकीय...

### पाकच्या अपेक्षा धुळीस मिळाल्या

आखातातील संघर्षाचा तिढा सुटण्याच्या टप्प्यावर असून अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी व्हाईट हाऊसमध्ये यासंदर्भातील कराराची घोषणा केली. १०० दिवसांहून अधिक काळ चाललेल्या या संघर्षाचे भीषण परिणाम सोसणाऱ्या जगासाठी हा करार प्रत्यक्षात पूर्ण होईल, तो दिवस दिवाळीसम असेल. भारतासाठी या घडामोडीमध्ये एक महत्त्वाची बाब अंतर्भूत आहे. या संपूर्ण प्रक्रियेत पाकिस्तानला पूर्णतः बाजूला सारले आहे. फेब्रुवारीत अमेरिका-इराण संघर्ष टोकाला पोहोचला होता, तेव्हा पाकिस्तानने मध्यस्थाची भूमिका बजावली होती. लष्करप्रमुख असीम मुनीर आणि पंतप्रधान शहबाज शरीफ यांनी जोरदार मोर्चेबांधणी केली होती. एप्रिल महिन्यात तात्पुरती युद्धबंदी झाली, तेव्हा या कराराची 'इस्लामाबाद अकॉर्ड' म्हणून नोंद व्हावी, अशी पाकची अपेक्षा होती; मात्र अमेरिकेने आताचा करार पाकिस्तानमध्ये न करता युरोपमधील शहरात होणार असल्याचे स्पष्ट केल्याने पाकच्या अपेक्षा धुळीस मिळाल्या. आयएमएफच्या अटींचे कडक पालन आणि या युद्धाच्या दुहेरी आर्थिक फटक्यामुळे पाकची अर्थव्यवस्था प्रचंड दबावाखाली आहे. पाकिस्तानची अर्थव्यवस्था आखाती देशांतून होणारी ऊर्जा आयात, तेथून येणारे परकीय चलन आणि आर्थिक साहाय्यावर मोठ्या प्रमाणावर अवलंबून असल्याने या संघर्षाचा सर्वाधिक फटका इस्लामाबादला बसला. तेथील महागाई उच्चांकी स्तरावर गेली. पाकमधील अनधिकृत अर्थव्यवस्थेचा विस्तार मोठा आहे. एकूण लोकसंख्येपैकी केवळ १.३ टक्के नागरिकच आयकर विवरणपत्र भरतात. वित्तीय तूट कमी करण्याच्या नादात सरकार पायाभूत सुविधा आणि आर्थिक विकासावरील खर्च कपात करत असून, संरक्षण आणि अंतर्गत सुरक्षेशिवाय इतर कोणत्याही नवीन प्रकल्पांची घोषणा न करण्याचे धोरण अवलंबत आहे. नाणेनिधीच्या दबावामुळे लागू करण्यात येणाऱ्या जाचक अटींमुळे सामान्य नागरिकांमध्ये कमालीचा रोष आहे. सीमाभागातील व्यापार ठप्प झाल्यामुळे एलपीजी आणि डिझेलच्या किमती दुप्पट झाल्या. खत कारखाने बंद करावे लागल्याने शेती उत्पादन घटण्याची आणि अन्न सुरक्षेचा प्रश्न निर्माण होण्याची भीती आहे. या भीषण परिस्थितीत नागरिकांना दिलासा देण्याऐवजी पाकिस्तानी राज्यकर्ते नृशंस धोरणे राबवत आहेत. महागाई, करांमधील अनपेक्षित वाढ, पिण्याच्या पाण्याचा तुटवडा आणि पिठासारख्या जीवनावश्यक वस्तूंचे गगनाला भिडलेले भाव यामुळे पाकव्याप्त काश्मीरमध्ये मोठ्या प्रमाणावर जनक्षोभ उसळला. आंदोलकांच्या भावना समजून घेण्याऐवजी शरीफ सरकारने लष्कराकरवी हा निषेध दडपण्याचा प्रयत्न केला. वरवर पाहता हे आंदोलन आर्थिक मागण्यांसाठी असले, तरी याच्या मुळाशी पाकव्याप्त काश्मीरच्या स्वायत्ततेचा आणि पाकिस्तानच्या हुकूमशाहीचा मुद्दा कारणीभूत आहे. पाकिस्तानने जागतिक समुदायाला दाखवण्यासाठी या प्रदेशाला एक स्वतंत्र दर्जा दिला असला, तरी पडद्यामागून संपूर्ण सत्ता इस्लामाबादमधील केंद्र सरकारच्या आणि प्रामुख्याने पाकिस्तानी लष्कराच्या हातात एकवटली आहे. पाकच्या संविधानातील काही तरतुदी या प्रदेशातील स्थानिक जनतेच्या गळा घोटणाऱ्या ठरल्या आहेत. या संपूर्ण व्यवस्थेतील सर्वात मोठा अडथळा म्हणजे 'आझाद जम्मू आणि काश्मीर कौन्सिल' ही संस्था आहे. या कौन्सिलचे अध्यक्ष स्वतः पाकिस्तानचे पंतप्रधान असतात, तर पाच केंद्रीय मंत्री याचे सदस्य असतात. कर आकारणी, नैसर्गिक संसाधनांचा वापर, आर्थिक नियोजन आणि थेट परकीय गुंतवणूक यांसारख्या विषयांवर निर्णय घेण्याचा अधिकार केवळ या कौन्सिलला म्हणजेच थेट इस्लामाबादला आहे. त्यामुळे पीओकेमधील लोकनियुक्त पंतप्रधान आणि राष्ट्रपती हे केवळ नामधारी प्रमुख ठरतात, ज्यांना जनतेसाठी स्वतंत्रपणे कोणताही आर्थिक किंवा राजकीय निर्णय घेण्याचे स्वातंत्र्य नसते. तेथील कोणत्याही नागरिकाला किंवा राजकीय पक्षाला पाकिस्तानमधील विलीनीकरणाच्या कल्पनेला विरोध करण्याचा अधिकार नाही. एखाद्या व्यक्तीने किंवा पक्षाने जम्मू-काश्मीरच्या पूर्ण स्वातंत्र्याची किंवा भारतासोबत जाण्याची भूमिका घेतली, तर त्याला देशद्रोही ठरवून निवडणुकीत लढवण्यास अपात्र केले जाते. सरकारी नोकऱ्यांसाठीदेखील पाकिस्तानप्रती निष्ठा राखण्याची शपथ घेणे बंधनकारक आहे. स्थानिक जनतेला केवळ पाकिस्तानच्या इशाऱ्यावर चालणारे राजकारण करण्याचीच परवानगी असून, अभिव्यक्ती स्वातंत्र्यावर गदा आणली आहे. सध्याच्या आंदोलनाचा थेट संबंध याच छुप्या शोषणाशी जोडलेला आहे. पाकव्याप्त काश्मीर हा जलसंपत्तीत अत्यंत समृद्ध आहे. येथील नीलम आणि झेलम नद्यांवरील धरणांमधून वीजनिर्मिती केली जाते; मात्र पीओकेमधील जनतेला अत्यंत महागड्या दराने वीज खरेदी करावी लागत आहे. पाक सरकारने वीज दरात आणि गव्हाच्या किमतीवर मिळणाऱ्या अनुदानात कपात केल्यामुळे स्थानिक जनतेचा संयम सुटला आणि त्यांनी 'अवामी क्शन कमिटी'च्या नेतृत्वाखाली व्यापक आंदोलन सुरू केले. स्थानिक जनतेच्या मते, ज्या धरणांच्या उभारणीसाठी आमच्या पूर्वजांनी जमिनी गमावल्या, विस्थापित झाले, त्याच धरणांतून तयार होणारी वीज आम्हाला अवाजवी दराने विकणे हा अन्याय आहे. पाकच्या केंद्रीय नेतृत्वाने नेहमीच या प्रदेशाचा वापर केवळ भूराजकीय फायद्यासाठी आणि भारताच्या विरोधात एक हत्यार म्हणून केला. स्थानिक पायाभूत सुविधांचा विकास, आरोग्य यंत्रणा आणि शिक्षण याकडे सातत्याने दुर्लक्ष केले. पाकिस्तान स्वतः गंभीर आर्थिक संकटाचा सामना करत असल्याने त्याचा थेट बोजा या उपेक्षित प्रदेशावर टाकला जात आहे. एकीकडे सर्वसामान्य जनता गरिबी आणि महागाईने होरपळत असताना दुसरीकडे पाकव्याप्त काश्मीरमधील सरकारी अधिकारी, मंत्री आणि नोकरशहा यांच्या विलासी राहणीमानावर प्रचंड खर्च केला जात आहे. मोफत गाड्या, इंधन आणि इतर भत्त्यांवर स्थानिकांनी तीव्र आक्षेप घेतला आहे. पीओकेचा ध्वज, पंतप्रधान आणि घटना हे केवळ जगाच्या डोळ्यात धूळ फेकण्यासाठीचे साधन असून, प्रत्यक्षात ते एका वसाहतीसारखे जीवन जगत आहेत, याची जाणीव झाल्याने या प्रदेशातील प्रदीर्घ असंतोष आता हिंसक आंदोलनाच्या रूपाने बाहेर पडत आहे. हा संपूर्ण प्रदेश मागासलेला असून, दहशतवाद आणि सुरक्षेच्या कारणास्तव येथे मोठ्या प्रमाणावर लष्कर तैनात आहे. लष्कराकडून होणाऱ्या शोषणाबाबतही स्थानिक जनतेतील राग पराकोटीला गेला आहे. पाकिस्तानची ढासळती अर्थव्यवस्था आणि अंतर्गत राजकीय अस्थिरता पाहता पाकव्याप्त काश्मीरमधील असंतोषाचा ज्वालामुखी पाकिस्तानसाठी येणाऱ्या काळात अत्यंत घातक ठरू शकतो.

# नि:पक्ष, भयमुक्त निवडणुकीसाठी आवश्यक उपाययोजना करा- निवडणूक निरीक्षक मिलिंद बोरकर

**लातूर/प्रतिनिधी :** महाराष्ट्र विधानपरिषदेच्या उस्मानाबाद-लातूर-बीड स्थानिक प्राधिकारी मतदारसंघ द्विवार्षिक निवडणुकीसाठी १८ जून रोजी मतदान होणार आहे. प्रत्येक तहसीलदार कार्यालयामध्ये यासाठी मतदान केंद्राची निर्मिती करण्यात आली असून या मतदान केंद्रांवर किमान आवश्यक सुविधा उपलब्ध करून द्याव्यात. तसेच ही निवडणूक नि:पक्ष आणि भयमुक्त वातावरणात पार पाडण्यासाठी आवश्यक उपाययोजना करण्याच्या सूचना निवडणूक निरीक्षक मिलिंद बोरकर यांनी दिले. लातूर जिल्हाधिकारी कार्यालयातील नियोजन समिती सभागृहात आयोजित मतदान केंद्राध्यक्ष, मतदान केंद्रस्तरीय अधिकारी, सूक्ष्म निरीक्षक यांच्या प्रशिक्षणाप्रसंगी ते बोलत होते.

यावेळी जिल्हाधिकारी डॉ. भारत बास्टेवाड, जिल्हा परिषदेच्या अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी असलम तडवी, लातूर शहर महानगरपालिका अतिरिक्त आयुक्त देविदास जाधव, निवासी उपजिल्हाधिकारी केशव नेटके, उपजिल्हा निवडणूक अधिकारी गणेश पवार यावेळी उपस्थित होते.

मतदान साहित्य वितरण व स्वीकृती केंद्राचे काम योग्य प्रकारे पार पाडावे. मतपेट्या सुरक्षितपणे मतदान केंद्रावर पोहोचविणे तसेच मतदानानंतर सीलबंद मतपेट्यांची वाहतूक कडक सुरक्षा व्यवस्थेत करावी. या प्रक्रियेत कोणतीही उणीव राहणार नाही याची विशेष दक्षता घ्यावी. मतदान केंद्र तहसील कार्यालयात असल्याने मतदारांच्या सोयीसाठी रॅम्प व व्हीलचेअरची व्यवस्था उपलब्ध असावी. निवडणूक काळात कोणताही अनुचित प्रकार घडणार नाही याची खबरदारी घ्यावी. निवडणूक प्रक्रिया पूर्णपणे नि:पक्षपाती राहण्यासाठी संबंधित अधिकाऱ्यांनी जबाबदारीने काम करावे, असेही निवडणूक निरीक्षक श्री. बोरकर यांनी सांगितले.

मतदान केंद्रावर नियुक्त सर्व केंद्राध्यक्ष, कर्मचारी यांनी भारत निवडणूक आयोगाच्या निर्देशांचे काटेकोरपणे पालन करावे. सर्वांनी समन्वयाने काम करून मतदान प्रक्रिया शांततेत पार पाडावी, असे जिल्हाधिकारी डॉ. भारत बास्टेवाड यावेळी म्हणाले. प्रारंभी देवणीचे तहसीलदार सोमनाथ वाडकर यांनी उपस्थितांना निवडणूक विषयक प्रशिक्षणाची माहिती दिली.

लातूर, औसा येथील मतदान केंद्रांना भेट; सुरक्षा कक्षाची पाहणी

उस्मानाबाद-लातूर-बीड स्थानिक प्राधिकारी मतदारसंघाचे निवडणूक निरीक्षक मिलिंद बोरकर यांनी लातूर तहसीलदार कार्यालय आणि औसा तहसील कार्यालय येथील मतदान केंद्रांना भेट देवून तेथील सुविधांची पाहणी केली. तसेच जिल्हाधिकारी कार्यालयात तयार करण्यात आलेल्या मतपेटी सुरक्षा कक्षाला भेट देवून तेथील उपाययोजनांचा आढावा घेतला.



# बोंबळीतील शेतकऱ्याची पसंती; अखेर मिळाला सशक्त बैल

**लातूर/प्रतिनिधी :** देवणी तालुक्यातील बोंबळी खुर्द येथील शेतकरी काशिनाथ गायकवाड यांना शासनाकडून मदत म्हणून देण्यात आलेला बैल अशक्त व आजारी असल्याचे समोर आले. त्यानंतर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी तातडीने दखल घेत संबंधित शेतकऱ्याच्या पसंतीनुसार सक्षम बैल उपलब्ध करून देण्याचे निर्देश जिल्हा प्रशासनाला दिले होते. त्यानुसार पशुसंवर्धन विभागाने योग्य बैलाची व्यवस्था केली. विशेष म्हणजे, बैलाची कार्यक्षमता स्वतः काशिनाथ गायकवाड यांनी औताला जुंपून तपासल्यानंतरच तो त्यांच्या ताब्यात देण्यात आला.



काशिनाथ गायकवाड हे भूमिहीन शेतकरी असून त्यांच्याकडे असलेल्या बैलजोडीच्या साहाय्याने ते व त्यांची पत्नी हौसाबाई परिसरातील शेतकऱ्यांची मशागत, नांगरणी, पेरणी व वखरणीची कामे करून उदरनिर्वाह करतात. मात्र, ५ जून रोजी झालेल्या वादळी पावसादरम्यान वीज पडून त्यांच्या एका बैलाचा मृत्यू झाला. त्यामुळे सुरू असलेली कामे पूर्ण करण्यासाठी त्यांना पत्नी हौसाबाई यांनाच जोखडाला जुंपावे लागले होते. ही बाब मुख्यमंत्री फडणवीस यांच्या निदर्शनास आल्यानंतर त्यांनी जिल्हाधिकारी वर्षा ठाकूर-बालकवडे यांना तातडीने बैल उपलब्ध करून देण्याचे निर्देश दिले. त्यानुसार एक बैल देण्यात आला; मात्र तो औताला जुंपल्यानंतर वारंवार बसत असल्याने त्याची कार्यक्षमता अपुरी असल्याचे आढळले. याची माहिती मुख्यमंत्र्यांपर्यंत पोहोचताच त्यांनी पुन्हा एकदा शेतकऱ्याच्या पसंतीनुसार सक्षम बैल देण्याचे आदेश दिले.

त्यानुसार शुक्रवारी पशुसंवर्धन विभागाच्या पथकाने विविध ठिकाणी शोधमोहीम राबवून रेणापूर तालुक्यातील एका शेतकऱ्याकडील बैल निवडला. हा बैल औताला जुंपून त्याची ताकद व कार्यक्षमता स्वतः काशिनाथ गायकवाड यांनी तपासली. समाधान झाल्यानंतर त्यांच्या संमतीने तो बैल त्यांच्या ताब्यात देण्यात आला.

यावेळी पशुसंवर्धन विभागाचे उपायुक्त डॉ. राजकुमार पडीले, सहाय्यक आयुक्त डॉ. श्रीधर शिंदे, देवणी तालुका सहाय्यक आयुक्त डॉ. जे. पी. वाघमारे तसेच रेणापूर तालुका सहाय्यक आयुक्त डॉ. आर. जी. पडगीलवार उपस्थित होते.

### आता अशोक खरातची सुटका नाही! उज्ज्वल निकम यांची विशेष सरकारी वकील म्हणून नियुक्ती

नाशिक : महाराष्ट्रासह देशाला हादरावून सोडणाऱ्या नाशिकमधील भोंदूबाबा अशोक खरात प्रकरणी आता एक महत्त्वाची घडामोड घडली आहे. खरात बाबा प्रकरणात अंधश्रद्धा विरोधी खटल्यासाठी ज्येष्ठ विधिज्ञ उज्ज्वल निकम यांची 'विशेष सरकारी वकील' म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे. उज्ज्वल निकम यांच्या नियुक्तीमुळे आता राजकीय चर्चांना उधाण आलं आहे.

अशोक खरात सध्या पोलीस आणि ईडीच्या ताब्यात आहे. नाशिकच्या सरकारवाडा पोलीस ठाण्यात दाखल झालेल्या एकूण ८ वेगवेगळ्या गुन्ह्यांचे कामकाज आता उज्ज्वल निकम पाहणार आहेत. यासाठी उज्ज्वल निकम यांची सरकारी वकील म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे.परिमल फाळे सहाय्यक म्हणून नियुक्त: या खटल्यात उज्ज्वल निकम यांना सहकार्य करण्यासाठी राज्य शासनाने परिमल फाळे यांची 'सहाय्यक विशेष सरकारी वकील' म्हणून नियुक्ती केली आहे. दोन्ही वकिलांच्या मानधनाचा (फी) खर्च राज्य शासनाचा गृह विभाग उचलणार आहे. महाराष्ट्र शासनाच्या विधी आणि न्याय विभागाने ११ जून २०२६ ला या नियुक्तीची अधिकृत अधिसूचना जारी केली आहे.नाशिकमधील स्वयंघोषित भोंदूबाबा आणि स्वता:ला ज्योतिषी आणि अंकशास्त्रज्ञ समजून घेणारा अशोक खरातवर वेगवेगळे गुन्हे दाखल असून सध्या तो पोलीस स्टेशनमध्ये मुक्कामी आहे. त्याच्याविरोधात नाशिकच्या सरकारवाडा पोलीस ठाण्यात एकापाठोपाठ ८ वेगवेगळ्या गंभीर गुन्ह्यांची नोंद आहे. या प्रकरणाचा सध्या तपास सुरू आहे. त्याच्यावर या ८ गुन्ह्यांमध्ये बलात्कार, फसवणूक, गुंगीकारक औषध देणे, जादूटोणा विरोधी कायदा आणि फार्महाऊसवर पिस्तूल व जिवंत काडतुसे सापडल्यामुळे आर्म्स ॲक्ट अशा विविध कडक कलमांचा समावेश आहे. या प्रकरणी वरिष्ठ पोलीस अधिकारी तेजस्विनी सातपुते यांच्या नेतृत्वाखाली विशेष तपास पथकाची स्थापना केली आहे. सरकारवाडा पोलीस आणि गुन्हे शाखेचे पथक या प्रकरणाचा तपास करत आहे. सध्या या प्रकरणात आता ईडीची एंट्री झाली आहे. ईडीकडूनही त्याच्या संपत्तीचा तपास केला जात आहे.

# निकाल, नैराश्य आणि निसटणारे जीव : गुणांपेक्षा माणूस मोठा आहे हे आपण कधी मान्य करणार?

देशभरात नीट, जेईई, एमपीएससी, यूपीएससी, बारावी, दहावी अशा विविध स्पर्धात्मक आणि शैक्षणिक परीक्षांचे निकाल जाहीर होत आहेत. निकाल जाहीर होण्याचा हा काळ अनेक कुटुंबांसाठी आनंदाचा असतो, तर काहींसाठी तो असह्य वेदनेचा. प्रत्येक वर्षी निकालानंतर काही विद्यार्थी नैराश्यात जातात, काही स्वतःला अपयशी समजू लागतात आणि दुर्दैवाने काहीजण आत्महत्येसारखे टोकाचे पाऊल उचलतात. वृत्तपत्रांच्या छोट्याशा बातम्यांमध्ये अशा मृत्यूंची नोंद होते, पण त्या प्रत्येक बातमीमागे एक उद्ध्वस्त कुटुंब, तुटलेली स्वप्ने आणि समाजाच्या अपयशाची एक मोठी कहाणी दडलेली असते. प्रश्न असा आहे की, एका परीक्षेच्या निकालामुळे एखाद्या विद्यार्थ्याला स्वतःचे जीवन संपवावेसे का वाटते? त्याच्या मनात एवढा प्रचंड ताण निर्माण होतोच कसा? आणि यासाठी जबाबदार कोण?




आज शिक्षण हे ज्ञान मिळवण्याचे साधन कमी आणि स्पर्धेचे रणांगण अधिक बनले आहे. डॉक्टर, अभियंता, प्रशासकीय अधिकारी किंवा प्रतिष्ठित व्यावसायिक बनण्याचे स्वप्न पाहणे चुकीचे नाही. मात्र त्या स्वप्नांना प्रतिष्ठा आणि सामाजिक सन्मानाची अशी चौकट मिळाली आहे की त्यात अपयश आले की विद्यार्थ्याला स्वतःचे अस्तित्वच निरर्थक वाटू लागते. गुण आणि रँक यांनाच यशाचे अंतिम मोजमाप समजले जाऊ लागले आहे. नीटसारख्या परीक्षांमध्ये लाखो विद्यार्थी बसतात, पण जागा मर्यादित असतात. याचा अर्थ लाखो विद्यार्थी कमी बुद्धिमान आहेत असा होत नाही. मात्र निकालाच्या दिवशी समाजाची मानसिकता अशी असते की यशस्वी विद्यार्थी "हुशार" आणि अपयशी विद्यार्थी "नालायक" ठरतो. ही विभागणी अन्यायकारक असून विद्यार्थ्यांच्या मानसिक आरोग्यावर घाव घालणारी आहे.

आज अनेक पालक आपल्या अपूर्ण राहिलेल्या आकांक्षा मुलांच्या खांद्यावर लादताना दिसतात. मुलाला डॉक्टर व्हायचे आहे की नाही, यापेक्षा आई-वडिलांना तो डॉक्टर व्हावा असे वाटते. त्यासाठी लाखो रुपये खर्च करून कोचिंग क्लासेसमध्ये प्रवेश दिला जातो. सकाळपासून रात्रीपर्यंत अभ्यास, टेस्ट सिरीज, रँकिंग आणि तुलना यांचे चक्र सुरू असते. अशा परिस्थितीत विद्यार्थी हळूहळू स्वतःच्या इच्छांपासून दूर जातो आणि केवळ अपेक्षांचे ओझे वाहू लागतो. निकाल अपेक्षेप्रमाणे आला नाही की त्याला वाटते, "मी आई-वडिलांना निराश केले", "माझ्यामुळे त्यांचे पैसे वाया गेले", "आता समाजात तोंड दाखवायला जागा नाही." ही भावना इतकी तीव्र होते की जीवनापेक्षा अपयश मोठे वाटू लागते. प्रत्यक्षात अपयश तात्पुरते असते, पण त्या क्षणी विद्यार्थ्याला ते कायमचे वाटत असते.

आपली शिक्षणव्यवस्था देखील या समस्येस काही प्रमाणात जबाबदार आहे. शाळा आणि महाविद्यालयांमध्ये गुण, टक्केवारी आणि रँक यांवर भर दिला जातो, मात्र मानसिक आरोग्य, भावनिक स्थैर्य आणि अपयशाचा सामना कसा करावा याचे शिक्षण फारसे दिले जात नाही. विद्यार्थ्यांना गणित, विज्ञान, इतिहास शिकवला जातो पण तणाव हाताळणे, स्वतःला स्वीकारणे आणि संकटातून उभे राहणे याचे धडे कोणी शिकवत नाही. कोटा, पुणे, नागपूर, मुंबई, दिल्ली यांसारख्या कोचिंग केंद्रांमध्ये हजारो विद्यार्थी घरापासून दूर राहून शिक्षण घेतात. स्पर्धेचे प्रचंड दडपण, एकाकीपणा आणि सततच्या तुलनेमुळे अनेक विद्यार्थ्यांचे मानसिक संतुलन ढासळते. काहीजण नैराश्याच्या गर्तेत जातात. दुर्दैवाने मानसिक आरोग्याबाबत अजूनही समाजात अनेक गैरसमज आहेत. मानसोपचार तज्ज्ञांकडे जाणे म्हणजे "वेडेपणा" असे मानले जाते. परिणामी अनेक विद्यार्थी मदत मागण्याचे धाडसच करत नाहीत.

सोशल मीडियानेही या तणावात भर घातली आहे. निकालाच्या दिवशी सर्वत्र टॉपरांच्या मुलाखती, यशोगाथा, अभिनंदनाचे संदेश यांचा पूर आलेला असतो. हे यश साजरे करणे आवश्यक आहेच पण त्याच वेळी अपयशी विद्यार्थ्यांच्या मनात न्यूनगंड निर्माण होतो. प्रत्येक जण स्वतःची तुलना इतरांशी करू लागतो. "तो यशस्वी झाला, मी का नाही?" हा प्रश्न त्याला आतून पोखरत राहतो. खरे तर इतिहास सांगतो की आयुष्यातील मोठे यश मिळवणाऱ्या अनेक व्यक्तींना सुरुवातीला अपयश आले होते. अनेक शास्त्रज्ञ, उद्योगपती, साहित्यिक, कलाकार आणि नेते परीक्षांमध्ये अव्वल नव्हते. पण त्यांनी अपयशाला शेवट न मानता नवी सुरुवात मानली. दुर्दैवाने आजच्या विद्यार्थ्यांपर्यंत हा संदेश पुरेशा प्रभावीपणे पोहोचत नाही.

आत्महत्या ही कोणत्याही समस्येचे उत्तर नाही. ती एका क्षणाच्या नैराश्यात घेतलेला कायमस्वरूपी निर्णय असतो. एखाद्या विद्यार्थ्याच्या मृत्यूनंतर त्याच्या पालकांची अवस्था काय होत असेल, याची कल्पनाही करवत नाही. निकालात अपयश आले म्हणून दुःखी असलेले आई-वडील, मुलाच्या मृत्यूनंतर आयुष्यभर स्वतःला दोष देत राहतात. एक निकाल पुन्हा देता येतो, पण गेलेला जीव कधीच परत आणता येत नाही. समाज म्हणून आपणही आत्मपरीक्षण करण्याची गरज आहे. आपण मुलांना नेहमी विचारतो, "किती मार्क पडले?" पण क्वचितच विचारतो, "तू आनंदी आहेस का?" आपण गुणांचे कौतुक करतो पण प्रयत्नांचे किती कौतुक करतो? आपण यशस्वी विद्यार्थ्यांचे सत्कार करतो पण अपयशी विद्यार्थ्यांच्या खांद्यावर आधाराचा हात ठेवतो का?

पालकांनी सर्वप्रथम मुलांशी संवाद वाढवण्याची गरज आहे. निकाल काहीही असो, "आम्ही तुझ्यासोबत आहोत" हा विश्वास मुलाला मिळाला पाहिजे. मुलाचे मूल्य त्याच्या गुणांवर नाही, तर त्याच्या व्यक्तिमत्त्वावर आणि माणूसपणावर अवलंबून आहे, हे त्याला सातत्याने जाणवले पाहिजे. शाळा, महाविद्यालये आणि कोचिंग संस्था यांनी मानसिक आरोग्य सल्लागारांची व्यवस्था करणे ही काळाची गरज आहे. प्रत्येक विद्यार्थ्याला समुपदेशनाची सुविधा सहज उपलब्ध झाली पाहिजे. तणाव, नैराश्य आणि आत्महत्येची लक्षणे ओळखण्यासाठी शिक्षकांना विशेष प्रशिक्षण दिले पाहिजे. सरकारनेही शिक्षणातील स्पर्धेचे दुष्परिणाम गांभीर्याने घेण्याची आवश्यकता आहे. परीक्षांचे स्वरूप, प्रवेशप्रक्रिया आणि विद्यार्थ्यांच्या मानसिक आरोग्याविषयी व्यापक धोरणे आखली पाहिजेत. शिक्षणाचा उद्देश केवळ रोजगार नव्हे, तर सक्षम आणि आनंदी नागरिक घडवणे हा असला पाहिजे.



आज गरज आहे ती यशाची व्याख्या बदलण्याची. डॉक्टर, अभियंता किंवा अधिकारी होणे हेच यश नाही. प्रत्येक मुलामध्ये वेगळी क्षमता असते. कोणीतरी कलाकार होऊ शकतो, कोणीतरी लेखक, उद्योजक, शेतकरी, संशोधक किंवा समाजसेवक. प्रत्येक क्षेत्राला समाजात समान सन्मान मिळाला पाहिजे. निकालाच्या दिवसांत आपण एक गोष्ट कायम लक्षात ठेवली पाहिजे, गुणपत्रिका ही विद्यार्थ्याच्या आयुष्याचा संपूर्ण अहवाल नसते. ती केवळ एका परीक्षेतील कामगिरीची नोंद असते. माणसाची किंमत त्याच्या गुणांनी नव्हे, तर त्याच्या जिद्दीने, संवेदनशीलतेने आणि पुन्हा उभे राहण्याच्या क्षमतेने ठरते. प्रत्येक विद्यार्थ्याला, प्रत्येक पालकाला आणि संपूर्ण समाजाला आज हा संदेश देण्याची गरज आहे की, अपयश म्हणजे शेवट नाही तर तो नव्या सुरुवातीचा पहिला टप्पा आहे. एका निकालामुळे जीवन संपवण्याइतके जीवन स्वस्त नाही. कारण गुणपत्रिकेतील आकडे बदलू शकतात, करिअरचे मार्ग बदलू शकतात पण एकदा निसटलेला जीव मात्र पुन्हा कधीच परत येत नाही. निकाल महत्त्वाचा असतो, पण जीवन त्याहूनही अधिक महत्त्वाचे असते आणि म्हणूनच, प्रत्येक विद्यार्थ्याला आपण सांगायला हवे "तू गुणांपेक्षा मोठा आहेस, रँकपेक्षा मौल्यवान आहेस आणि कोणत्याही परीक्षेपेक्षा तुझे जीवन अधिक महत्त्वाचे आहे."

**प्रविण बागडे**
नागपूर
मो.क्र. ९९२३६२०९२९

# पुरुषोत्तमपूरी अधिकमास यात्रेदरम्यान मोठी दुर्घटना; गोदावरीत बोट उलटून दोन महिलांचा मृत्यू तर अनेक भाविक जखमी

**माजलगाव/प्रतिनिधी :** बीड जिल्ह्यातील पुरुषोत्तमपुरी येथे सुरू असलेल्या अधिकमास यात्रेदरम्यान बुधवारी गोदावरी नदीत झालेल्या बोट दुर्घटनेने यात्रास्थळी शोककळा पसरली. भाविकांनी भरलेली बोट नदीच्या मध्यभागी असताना अचानक उलटल्याने दोन महिलांचा दुर्दैवी मृत्यू झाला, तर अनेक भाविक जखमी झाले आहेत. जखमींवर माजलगाव व परिसरातील शासकीय तसेच खासगी रुग्णालयांत उपचार सुरू आहेत.देशातील एकमेव भगवान पुरुषोत्तम मंदिरामुळे प्रसिद्ध असलेल्या पुरुषोत्तमपुरी येथे अधिकमासानिमित राज्यासह विविध भागांतून मोठ्या संख्येने भाविक दाखल होत आहेत.यात्रेच्या पार्श्वभूमीवर गोदावरी नदीच्या दोन्ही तीरांवर मोठी गर्दी झाली होती. नदी पार करण्यासाठी भाविकांनी भरलेली बोट प्रवास करत असताना अचानक तोल जाऊन नदीत उलटली. या घटनेमुळे काही काळ परिसरात भीती आणि गोंधळाचे वातावरण निर्माण झाले.



प्रत्यक्षदर्शींनी दिलेल्या माहितीनुसार, बोटीत मोठ्या संख्येने भाविक प्रवास करत होते. बोट उलटताच अनेक प्रवासी नदीत पडल्याने आरडाओरड सुरू झाली. काही भाविकांनी स्वतः पोहून किनारा गाठला, तर स्थानिक नागरिक, स्वयंसेवक, मच्छीमार, पोलीस महसूल प्रशासन आणि आपत्ती व्यवस्थापन पथकांनी तत्काळ मदतकार्य सुरू करून अनेकांना सुरक्षित बाहेर काढले. या दुर्घटनेत प्रणिता शेषराव राठोड (वय ५५, रा. लोणार) यांचा मृत्यू झाला. तसेच सिंधूबाई अर्जुन मवाळ (वय ७५, रा. महागाव, जि. वाशिम) यांचाही उपचारादरम्यान मृत्यू झाल्याची माहिती समोर आली आहे. अन्य जखमींवर उपचार सुरू असून काहींची प्रकृती चिंताजनक असल्याचे समजते.दुर्घटनेनंतर बचाव व शोधकार्य युद्धपातळीवर राबविण्यात आले. आपत्ती व्यवस्थापन पथक, पोलीस आणि महसूल विभागाच्या अधिकाऱ्यांनी घटनास्थळी धाव घेत परिस्थिती नियंत्रणात आणली.या घटनेनंतर यात्रेतील सुरक्षा व्यवस्थेबाबत प्रश्नचिन्ह उपस्थित झाले आहे. बोटीत क्षमतेपेक्षा अधिक प्रवासी होते का, जीवनरक्षक जॅकेटची व्यवस्था करण्यात आली होती का, तसेच गर्दी नियंत्रणासाठी आवश्यक उपाययोजना करण्यात आल्या होत्या का, याबाबत चौकशीची मागणी नागरिकांकडून होत आहे. घटनेची माहिती मिळताच वरिष्ठ प्रशासकीय अधिकारी घटनास्थळी दाखल झाले. दुर्घटनेची सखोल चौकशी करून दोषींवर कठोर कारवाई करावी तसेच भविष्यात अशा घटना टाळण्यासाठी प्रभावी सुरक्षा उपाययोजना राबवाव्यात, अशी मागणी भाविक व नागरिकांकडून करण्यात येत आहे. या दुर्दैवी दुर्घटनेमुळे अधिकमास यात्रे उत्सवी वातावरणावर शोककळा पसरली असून संपूर्ण परिसरातून हळहळ व्यक्त करण्यात येत आहे.

## मूळ भाडेकरूच्या मृत्यूनंतर घर रिकामे करावे लागणार? हायकोर्टाच्या या मोठ्या निर्वाळ्याने सगळेच बदलले!

**मुंबई/प्रतिनिधी :** भाडेकरूंच्या हक्कांसंदर्भात मुंबई उच्च न्यायालयाने एक अत्यंत महत्त्वपूर्ण आणि ऐतिहासिक निर्णय दिला आहे. मूळ भाडेकरूच्या मृत्यूनंतर त्याचे भाडेकरूचे हक्क वारशाने मिळवण्यासाठी, संबंधित वारसदार मूळ भाडेकरूच्या मृत्यूच्या वेळी त्याच्यासोबत त्याच घरात राहत असणे आवश्यक नाही, असा मोठा निर्वाळा न्यायालयाने दिला आहे. दादर येथील पारसी कॉलनीतील एका सदनिकेबाबत (फ्लॅट) सुरू असलेल्या कायदेशीर वादात एका महिलेचा दावा मान्य करत न्यायालयाने हा दिलासा दिला.न्यायमूर्ती मिलिंद साठ्ये यांच्या एकलपीठाने 'पारसी पंचायत फंड्स अँड प्रॉपर्टीज बॉम्बे'च्या विश्वस्तांनी दाखल केलेली याचिका फेटाळून लावताना हा निकाल दिला. या प्रकरणाची पार्श्वभूमी अशी की, लघुवाद न्यायालय आणि त्याच्या अपिलीय न्यायालयाने एप्रिल १९९३ मध्ये मूळ भाडेकरू बाजी श्री. पटेल यांच्या मृत्यूनंतर, पटेल बिल्डिंगमधील संबंधित सदनिकेच्या कायदेशीर भाडेकरू म्हणून कॅटी मिस्त्री यांना मान्यता दिली होती. या निर्णयाला विश्वस्तांनी उच्च न्यायालयात आव्हान दिले होते.

विश्वस्तांचा दावा होता की, मिस्त्री यांचा घरमालकाशी कोणताही कायदेशीर करार नव्हता आणि पटेल यांच्या मृत्यूनंतर त्यांनी बेकायदेशीरपणे त्या जागेचा ताबा घेतला. विश्वस्तांच्या प्रतिनिधीने सदनिकेला कुलूप लावून नोटीस लावली होती, पण दीड तासानंतर परत आल्यावर कुलूप तोडलेले आढळले आणि आत चार व्यक्ती होत्या, ज्याची तक्रार पोलिसांतही करण्यात आली होती.

दुसरीकडे, कॅटी मिस्त्री यांनी आपण मूळ भाडेकरू पटेल यांच्या मावस बहीण आणि कायदेशीर वारसदार असल्याचा प्रतिदावा केला. न्यायालयाने दोन्ही बाजू ऐकून घेत स्पष्ट केले की, वारसाहक्काने भाडेकरूचे अधिकार मिळवण्यासाठी मृत्यूप्रसंगी सोबत राहण्याची सक्ती नाही. सन २००० सालापासून म्हणजेच गेल्या २६ वर्षांपासून उच्च न्यायालयात प्रलंबित असलेल्या या खटल्याचा अखेर निकाल लागला असून, यामुळे राज्यातील लाखो भाडेकरूंना मोठा दिलासा मिळण्याची शक्यता आहे.

## सलमान खानची बदनामी करणाऱ्या पनवेलमधील एनआरआय शेजाऱ्याला हायकोर्टाचा समजुतीवजा इशारा

**मुंबई/प्रतिनिधी** समाजमाध्यमांवर काहीही लिहिण्याची मोकळीक असणं याचा अर्थ एका व्यक्तीला दुसऱ्याची बदनामी करण्याचा परवाना मिळाला असा होत नाही. या शब्दांत हायकोर्टानं सलमान खानच्या पनवेलमधील फार्म हाऊसच्या शेजाऱ्याला खडसावलं. केतन कक्कड यांनी सलमान खान आणि त्यांच्या कुटुंबीयांबाबत सोशल मीडियावर टाकलेल्या पोस्ट आणि व्हिडिओ डिलीट करण्याबाबत विचार करावा, अन्यथा आम्हाला योग्य ते आदश द्यावे लागतील. असे निर्देश देत न्यायमूर्ती शर्मिला देशमुख यांनी गुरूवारी या प्रकरणाची सुनावणी ६ जुलैपर्यंत तहकूब केली. सलमान खान आणि त्याच्या कुटुबीयांविरोधात सोशल मीडियावर केलेली वक्तव्यं ही बदनामीकारक आणि जातीय तेढ निर्माण करणारी होती, असा दावा सलमान खानच्या वतीनं २०२२ मध्ये दाखल झालेल्या या याचिकेतून मुंबई हायकोर्टात करण्यात आला. पनवेल येथील सलमानच्या फार्महाऊसजवळच असलेल्या भूखंडाचे मालक केतन कक्कड यांनी एका यूट्युब चॅनलच्या माध्यमातून केलेल्या बदनामीविरोधात सलमाननं हायकोर्टात याचिका दाखल केली आहे. अशा प्रकारच्या अपमानकारक व्हिडिओला 'ब्लॉक' करत तत्काळ हटवून टाकावं, असे अंतरिम आदेश देण्याची विनंती सलमाननं हायकोर्टाकडं केली आहे. यापूर्वी सलमानची हीच मागणी मुंबई सत्र न्यायालयानं फेटाळून लावली होती, ज्याला सलमाननं हायकोर्टात आव्हान दिलं. या व्हिडिओतील अन्य दोन जणांना प्रतिवादी करताना ट्विटर, फेसबुक, यूट्युब आणि गुगललाही सलमाननं यात प्रतिवादी केलं होतं. या याचिकेवर न्यायमूर्ती शर्मिला देशमुख यांच्या एकलपीठासमोर गुरूवारी सुनावणी पार पडली. या सुनावणीत सलमानच्या वकिलांचा युक्तिवाद ऐकल्यानंतर न्यायमूर्ती देशमुख यांनी लोकांकडून सोशल मीडियाचा एकंदरीत होत असलेल्या गैरवापराबद्दल आपली नाराजी व्यक्त केली.

सोशल मीडियावर काहीही बोलण्याचं, लिहिण्याचं स्वातंत्र्य म्हणजे दुसऱ्या व्यक्तीची खुलेआम बदनामी करण्याचा परवाना, असं लोकांनी अर्थ घेऊ नये. कक्कड यांनी सलमान खानबाबत केलेल्या आक्षेपार्ह पोस्ट सोशल मीडियावर हटवण्याबाबत विचार करावा. अन्यथा आम्हाला योग्य ते आदेश द्यावे लागतील, अशी सूचना करत या प्रकरणाची सुनावणी चार आठवड्यांकरता तहकूब केली.

सलमान खान आणि केतन कक्कड यांच्यात जागेवरून वाद – केतन कक्कड यांनी व्हिडिओ आणि सोशल मीडिया पोस्टवरून केलेले आरोप हे खोटे, अपमानास्पद आणि बदनामी असून त्यामुळे सलमान आणि त्यांच्या कुटुंबातील सदस्यांना हकनाक त्रासाला सामोरे जावे लागत असल्याचा दावा याचिकेतून केला गेलाय. मुळात सलमान आणि एनआरआय असलेल्या कक्कडमध्ये जागेच्या अतिक्रमणावरून वाद आहे. मात्र त्या रागातून कक्कड यांनी केलेले हे सर्व आरोप वैयक्तिक पातळीवरचे आहेत. चाईल्ड ट्रॅफिकिंग, ड्रग ट्रॅफिकिंग, बलात्कार, सुशांत सिंहला ठार मारले, अंडरवर्ल्डशी संबंध, लँड माफिया, दहशतवादी तसेच पनवेलच्या या फॉर्म हाऊसमध्ये अनेकांचे मृतदेह गाडले गेलेत असे एक ना अनेक आरोप कोणताही पुरावा नसताना कक्कड यांच्याकडनं केले गेलेत.

## उत्कृष्ट गायक अनिल वैरागे व सौ. सुनीता उमाकांत बोधने, राष्ट्रीय कला समाज रत्न पुरस्काराने सन्मानित



**केज/प्रतिनिधी :** उत्कृष्ट गायक अनिल वैरागे व उत्कृष्ट गायिका सौ. सुनीता उमाकांत बोधने, यांना (राष्ट्रीय कला समाज रत्न पुरस्कार) तर सुप्रसिद्ध गायक गौतमजी खंडागळे, बीड येथील गायिका ललिता लांडगे ,गायिका निशा उजगिरे, यांना राष्ट्रीय कला रत्न पुरस्कार २०२६ एकता सेवाभावी संस्था, महाराष्ट्र आयोजित ११जुन रोजी मराठी पत्रकार भवन मनपा मार्ग आझाद मैदान मुंबई या ठिकाणी प्रतिष्ठित मान्यवरांच्या उपस्थितीत हा सोहळा संपन्न झाला. या पुरस्कार वितरण सोहळ्यासाठी ना. बाबासाहेब पाटील सहकार मंत्री मा. राज्य मुंबई तसेच कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून आमदार विक्रमजी काळे शिक्षक आमदार छ. संभाजी नगर,सुधाकरजी शर्मा ज्येष्ठ गीतकार बॉलीवूड तसेच अली खान सिने अभिनेते बॉलिवूड, सय्यद अली मुंबई विभाग अध्यक्ष एकता सेवाभावी संस्था यांच्या उपस्थितीत हा सोहळा संपन्न झाला.

यावेळी अनेक क्षेत्रातील मान्यवर उपस्थित होते या मान्यवरांच्या उपस्थितीमध्ये हा सोहळा अगदी मोठ्या थाटामाटा मध्ये संपन्न झाला . विविध क्षेत्रातील मान्यवरांची उपस्थिती होती.या सर्व कलावंतांचे व पुरस्कार विजेत्यांचे सर्व स्तरातून कौतुक होत आहे. व पुढील वाटचालीस शुभेच्छा देत आहे.

## स्पॉटिफायने डिस्को-बॉल आयकन मागं घेतला; मूळ २डी आयकन पुन्हा सक्रिय

**मुंबई/प्रतिनिधी** : वापरकर्त्यांच्या तीव्र विरोधानंतर स्पॉटिफायनं आपल्या आयफोन ॲपसाठी डिस्को-बॉल थीम असलेला नवीन आयकन मागं घेतला आहे. कंपनीनं मूळ २डी आयकन पुन्हा सुरू केला आहे.

२० वर्षांच्या सार्जयासाठी तात्पुरता बदल : स्पॉटिफायनं मे महिन्यात आपल्या २०व्या वर्धापनदिनानिमित्त आयओएस ॲप आयकनमध्ये बदल केला होता. चमकदार डिस्को-बॉल थीम असलेला हा नवीन लोगो कंपनीच्या ''डॉेंळिषू २०: धीीं झर्रीीं ष ींहश धशरीी(ी)'' या मोबाइल-एक्सक्लुसिव्ह इन-ॲपशी जोडला गेला होता. यात वापरकर्ते आपल्या गाणे ऐकण्याच्या इतिहासाचं पुनरावलोकन करू शकत होते. यात गेल्या वर्षातील संगीत प्रवास पुन्हा अनुभवू शकत होता. हा बदल केवळ तात्पुरता असल्याचं कंपनीनं सुरुवातीपासूनच स्पष्ट केलं होतं. मात्र, नवीन आयकनला मोठ्या प्रमाणात विरोध झाला. अनेक वापरकर्त्यांनी आयकन ''पिक्सेलेटेड'' दिसतो, छोट्या फोन स्क्रीनवर अस्वच्छ वाटतो आणि एकूणच दृष्यदृष्ट्या आकर्षक नाही अशी तक्रार केली. व्हॅरायटी वृत्तपत्रानुसार, अनेकांनी नवीन डिझाइनला ''दृष्यदृष्ट्या अप्रिय'' म्हटलंय. सोशल मीडियावर हॅशटॅग आणि टीकांच्या माध्यमातून मागणी करण्यात आली की मूळ क्लासिक आयकन परत आणावा.काही वापरकर्त्यांनी मात्र कंपनीच्या या निर्णयाचं स्वागत केलं. त्यांनी म्हटलं की,कंपनीनं आपल्या प्रसिद्ध लोगोत सर्जनशील जोखीम घेणे हे उत्सवपूर्ण आणि मजेदार आहे.

## १५ जून रोजी धाराशिवमध्ये शिकाऊ उमेदवारी भरती मेळावा ; टाटा मोटर्समध्ये संधी

**धाराशिव/प्रतिनिधी :** व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालयांतर्गत मूलभूत प्रशिक्षण तथा अनुषंगिक सूचना केंद्रामार्फत औद्योगिक प्रशिक्षण संस्था (आयटीआय), धाराशिव येथे १५ जून २०२६ रोजी शिकाऊ उमेदवारी भरती मेळाव्याचे आयोजन करण्यात आले आहे. या भरती मेळाव्यात नामांकित टाटा मोटर्स,पिंपरी (पुणे) कंपनीचे प्रतिनिधी सोमेश्र्वर सोनवणे उपस्थित राहणार आहेत. या भरती मेळाव्यात मोटार मेकॅनिक, डिझेल मेकॅनिक, फिटर, मशिनिस्ट, टूल अँड डाय मेकर,वेल्डर, शीट मेटल, इलेक्ट्रॉनिक्स मेकॅनिक आदी ट्रेडमधील प्रशिक्षणार्थींनी बायोडाट्यासह उपस्थित राहावे, असे आवाहन करण्यात आले आहे. भरती प्रक्रियेत अंतिम निवड झालेल्या उमेदवारांना अप्रेंटिसशिप कालावधीत प्रतिमाह १९ हजार ८५० रुपये विद्यावेतन देण्यात येणार आहे.

## दरोडा व गंभीर मारहाण प्रकरणात पाच आरोपींची निर्दोष मुक्तता

### ॲड.आदित्य राख यांचा प्रभावी युक्तिवाद; जिल्हा व सत्र न्यायालयाचा महत्त्वपूर्ण निकाल

**बीड/प्रतिनिधी :** दरोडा टाकून गंभीर मारहाण केल्याचा आरोप असलेल्या प्रकरणात जिल्हा व सत्र न्यायालयाने पाच आरोपींची निर्दोष मुक्तता करत महत्त्वपूर्ण निकाल दिला आहे. या प्रकरणात आरोपींच्या बाजूने ॲड. आदित्य ए. राख यांनी केलेला युक्तिवाद प्रभावी ठरला.



या बाबत अधिक माहिती अशी की, फिर्यादीने उमेश भोसले व इतर चार जणांविरुद्ध अंमळनेर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल केला होता.

फिर्यादीच्या तक्रारीनुसार, दिनांक ३० जुलै २०२४ रोजी मध्यरात्री साडेबारा वाजण्याच्या सुमारास आरोपींनी त्यांच्या घरात प्रवेश करून दरोडा टाकला. यावेळी फिर्यादी व त्यांच्या पत्नीला लोखंडी पाईप आणि चाकूच्या साहाय्याने मारहाण करून गंभीर जखमी करण्यात आल्याचा आरोप करण्यात आला होता. तसेच घरातील सुमारे १ लाख १० हजार रुपये किंमतीचे सोने-चांदीचे दागिने व रोख रक्कम लंपास केल्याचे तक्रारीत नमूद करण्यात आले होते.

या प्रकरणी अंमळनेर पोलीस ठाण्यात भारतीय न्याय संहिता (बिएनएस) कलम ३०९(६) व ३१०(२) अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला होता. या प्रकरणाचा तपास पूर्ण झाल्यानंतर पोलिसांनी न्यायालयात दोषारोपपत्र सादर केले. सुनावणीदरम्यान सरकार पक्षाकडून एकूण चार साक्षीदार तपासण्यात आले. मात्र, खटल्यादरम्यान सादर झालेला पुरावा, साक्षीदारांच्या साक्षीतील विसंगती तसेच आरोपींच्या बचाव पक्षाने मांडलेले मुद्दे न्यायालयाने गांभीर्याने विचारात घेतले. तसेच ॲड. आदित्य राख यांनी सखोल कायदेशीर अभ्यासावर आधारित युक्तिवाद सादर करत सरकार पक्षाचा आरोप संशयाच्या पलीकडे सिद्ध झालेला नसल्याचे न्यायालयाच्या निदर्शनास आणून दिले.

दोन्ही बाजूंचा युक्तिवाद, उपलब्ध पुरावे व प्रकरणातील सर्व बाबींचा विचार करून जिल्हा व सत्र न्यायालयाने आरोपींविरुद्धचे आरोप सिद्ध होत नसल्याचे नमूद करत सर्व पाचही आरोपींची निर्दोष मुक्तता केली. या प्रकरणात आरोपींच्या वतीने ॲड. आदित्य ए. राख यांनी प्रभावीपणे बाजू मांडली. त्यांना ज्येष्ठ विधिज्ञ ॲड. प्रवीण राख यांचे मार्गदर्शन लाभले. तसेच ॲड.जे.एल. पठाण,ॲड. एम. ए.तांबोळी, ॲड.आर. एस. कोरडे, ॲड. डी. व्ही. जाधव, ॲड.पालवे आणि ॲड. शलभ राख यांनीही सहकार्य केले.

# परळीतील धर्मापुरी येथील गांजा विक्रेत्यावर स्थानिक गुन्हे शाखेची धाडसी कारवाई!

## ९ लाख ७७ हजार ३२० रुपयाचा मुद्देमालासह एक आरोपी जेरबंद तर एक आरोपी फरार

**परळी/प्रतिनिधी :** बीड जिल्ह्यातील परळी ग्रामीण पोलीस ठाणे हद्दीमधील धर्मापुरी येथील गांजा विक्रेत्यावर स्थानिक गुन्हे शाखेने धाडसी कारवाई करत ९ लाख ७७ हजार ३२० रुपयाचा मुद्देमालासह एका आरोपीला जेरबंद केले असून सध्या एक आरोपी फरार असून पोलिसांनी तपासाची चक्रे गतीने फिरवून आरोपीचा शोध चालू केला असुन लवकरच फरार आरोपीला पोलीस बेड्या ठोकणार असल्याची माहिती पोलीस प्रशासनाकडून मीळाली आहे.

याबाबतची सविस्तर माहिती अशी की,दिनांक ११ जून २०२६ रोजी स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक शिवाजी बंटेवाड यांना एका गुप्त खबऱ्यामार्फत माहिती मिळाली की, बाबूलाल उर्फ बबलू अतार रा.धर्मापुरी ता.परळी जि. बीड हा त्याच्या राहत्या घरामध्ये गांजाची चोरटी विक्री करत आहे.

अशी माहिती मिळाल्यावरुन सदरची माहिती ही वरिष्ठांना कळवून त्यांच्या आदेशाने स्थानिक गुन्हे शाखेचे सहाय्यक पोलीस निरीक्षक धनराज जारवाल यांच्या समवेत पोह/दिलीप गीते, पोह/भागवत शेलार, पोह/दिपक खांडेकर,म पोह/स्वती मुंडे,चालक पोअं/हराळे व पोलीस ठाणे परळी ग्रामीणचे सहाय्यक पोलीस निरीक्षक मेंडके, पोह/वाले,पोह/नवनाथ हरगांवकर, महसूल विभागाचे सक्षम मंडळ अधिकारी श्रीमती पल्लेवाड मॅडम, धर्मापुरी तलाठी सज्जाचे तलाठी यासेर शेख यांच्यासह बाबुलाल उर्फ बबलू अतार याच्या घरी छापा मारला असता त्याच्या घरामध्ये २० किलो ३४० ग्रॅम वजनाचा गांजा मिळून आला.

तसेच गांजा विक्री करण्यासाठी एक इलेक्ट्रिकल वजन काटा असा एकूण ९ लाख ७७ हजार ३२० रुपये किमतीचा मुद्यमाल मिळून आल्याने आरोपी विरुद्ध पोलीस ठाणे परळी ग्रामीण येथे सहाय्यक पोलीस निरीक्षक धनराज जारवाल यांच्या फिर्यादीवरून गु.र.नं.२७४/२०२६ कलम २०,२९ एनडीपीएस नुसार आरोपी शेख बाबूलाल अतार व वशिम बाबूलाल अतार दोन्हीही रा.धर्मापुरी ता.परळी जि.बीड यांच्या विरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला असून सदरिल गुन्ह्याचा पुढील तपास हा परळी ग्रामीण पोलीस ठाण्याचे पोलीस हे करीत आहेत.

सदरची कारवाई प्रभारी पोलीस अधीक्षक श्रीमती चेतना तिडके मॅडम, सहाय्यक पोलीस अधीक्षक ऋषिकेश शिंदे, उपविभाग आंबेजोगाई, स्थानिक गुन्हे शाखेचे शिवाजी बंटेवाड यांच्या मार्गदर्शनाखाली सहाय्यक पोलीस निरीक्षक धनराज जारवाल, पोह/दिलीप गीते, पोह/भागवत शेलार, पोह/दीपक खांडेकर, मपोह/स्वाती मुंडे चालक पोअं/कराळे तसेच पोलीस ठाणे परळी ग्रामीणचे सहाय्यक पोलीस निरीक्षक मेंडके, पोह/वाले, पोह/नवनाथ हरगांवकर यांनी केली आहे. बाबूलाल उर्फ बबलू अतार याला पोलिसांनी अटक केले असून परार आरोपी वशिम अतार याला देखील लवकरच पोलीस बेड्या ठोकणार असल्याची पोलीस प्रशासनाकडून माहिती समोर येत आहे.



## जन्म नोंद आदेश प्रक्रिया शिथिल करण्याची पूर्व भाग कृती समितीची तहसीलदार यांच्या कडे मागणी



**लातूर/प्रतिनिधी** : जन्म प्रमाणपत्र आदेश मिळवण्यासाठी २०२५ वर्षात २२३ तर २०२६ चालू वर्षात १७६ मागणी अर्ज दाखल करण्यात आले पण एकही अर्ज निकाली काढण्यात आला नसल्याची लातूर शहर पूर्व भाग नागरी कृती समितीचे निवेदन दाखल झाले आहेत.

लातूर तालुक्यातील व शहरातील कांहीं नागरिकांचा जन्म घरी झाला किंवा वेळेत जन्म नोंद पूर्ण करण्यात आल्या नाहीत अशा नागरिकांना विलंबाने जन्म नोंदणी करण्याचे आदेश लातूर तहसीलदार यांच्याकडून दिल्या नंतर जन्म/ मृत्यू नोंदणी कार्यालयात नोंद घेऊन जन्म प्रमाणपत्र दिले जाते पण या प्रकियत लातूर तहसील कार्यालयात विविध पुरावे सादर करण्याच्या सूचना दिल्या जात आहेत त्यातील जाचक अटी पुरावे जसे की रुग्णालयातील लसीकरण नोंदणीकृत पुरावे १० /२० वर्षांपूर्वीचे पुरावे मिळत नाहीत शिवाय स्थानिक पोलीस निरीक्षक आव्हाल , मंडळाधिकारी आव्हाल ,मागितले जात असल्याने नागरिकांची हेळसांड होत असून यातील लसीकरण नोंदणी व आव्हाल उपलब्ध होत नसल्याने लातूर तहसील कार्यालयात वर्षभरात जन्म नोंदणी आदेश मिळावा म्हणून २०२५ वर्षात २२३ अर्ज तर २०२६ चालू वर्षात १७६ नागरिकांनी मागणी अर्ज प्रस्ताव दाखल केले त्यापैकी एकही अर्ज निकाली निघाले नसून जटिल जाचक अटी पूर्तता होत नसल्याने प्रलंबित राहात असल्याने नागरिकांची हेळसांड होत असल्याने याची गंभीर दखल घेऊन

विलंबाने जन्म नोंद प्रकरणी आदेश प्रक्रिया शिथिल करण्याची लातूर शहर पूर्व भाग नागरी कृती समितीच्या वतीने तहसीलदार यांच्या कडे निवेदनाच्या माध्यमातून मागणी करण्यात आली निवेदनावर दीपक गंगणे,बाबासाहेब बनसोडे,दीपमाला तुपकर , संजय उदारे,भगवेश्र्वर धनगर , बंडू देवांग्रे इत्यादींच्या स्वाक्षऱ्या आहेत

## ट्रेन तिकिट बुकिंगमध्ये मोठा बदल : नवीन IRCTC वेबसाइट या तारखेला होणार लाँच

**मुंबई/प्रतिनिधी** :रेल्वे मंत्री अश्विनी वैष्णव यांनी गुरुवारी जयपूरच्या मालवीय राष्ट्रीय तंत्रज्ञान संस्था (चछ्खढ) येथे विद्यार्थ्यांशी संवाद साधताना मोठी घोषणा केली. खठउढउ वेबसाइट नवीन लाँच करण्यात येणार असल्याचं वैष्णव यांनी म्हटलं आहे. ही नवीन वेबसाइट अधिक आधुनिक, वेगवान आणि वापरकर्ता-अनुकूल असेल, ज्यामुळं ट्रेन तिकिट बुकिंगची प्रक्रिया पूर्णपणे बदलणार आहे. सध्या भारतीय रेल्वेच्या आरक्षण प्रणालीला सुमारे ४० वर्षे झाली आहेत. नवीन प्रणालीमुळं प्रवाशांना अधिक सोयीस्कर अनुभव मिळेल.

खठउढउ वेबसाइट आणि झठड सिस्टमचा ओव्हरहॉल : भारतीय रेल्वे मंत्रालयानं मे महिन्यातच आपल्या जुन्या पॅसेंजर रिझर्वेशन सिस्टम (झठड) ला आधुनिक स्वरूप देण्याची घोषणा केली होती. नविन घीण्ऊण वेबसाइट १५ जुलै रोजी भारतात लाँच होणार असून ऑगस्ट महिन्यापासून ही नवीन प्रणाली कार्यान्वित होणार आहे. २००२ मध्ये सुरू झालेल्या ऑनलाइन तिकिट बुकिंग सेवेमध्ये ८८ टक्के मागणी पूर्ण होत आहे. नवीन झठड प्रणालीमुळे तिकिट बुकिंग क्षमता मोठ्या प्रमाणात वाढेल. गेल्या वर्षी मंत्रालयाने सांगितले होते की, नवीन प्रणाली एका मिनिटात १.५ लाखांहून अधिक तिकिटे बुक करण्यास सक्षम असेल. सध्याच्या ३२,००० तिकिटांच्या तुलनेत ही पाचपट वाढ आहे. तसंच, तिकिट चौकशी क्षमता दहापट वाढून ४ लाखांवरून ४० लाखांपर्यंत जाईल. नवीन सिस्टम बहुभाषिक असेल आणि वापरकर्त्यांसाठी अत्यंत सोपी असेल. नवीन झठड मध्ये प्रवाशांना आपली आवडती सीट निवडण्याची आणि कॅलेंडर पाहण्याची सुविधा उपलब्ध होईल. दिव्यांगजन, विद्यार्थी, रुग्णांसाठी विशेष सुविधा एकत्रित केल्या गेल्या आहेत. यामुळे तिकिट बुकिंग प्रक्रिया अधिक पारदर्शक आणि जलद होईल.

ठरळश्रजपश सुपर ॲपची भूमिका : गेल्या वर्षी भारतीय रेल्वेने ठरळश्रजपश मोबाइल ॲप्लिकेशन लाँच केले. हे 'सुपर ॲप' म्हणून ओळखले जाते. यात आर्टिफिशिअल इंटेलिजन्स (अघ) तंत्रज्ञानाचा वापर करून वेटिंग तिकिटाच्या कन्फर्मेशनची शक्यता अधिक अचूक सांगितली जाते. तिकिट बुक करताना ॲप लगेचच माहिती देतं की वेटलिस्ट तिकिट कन्फर्म होण्याची शक्यता किती आहे. याशिवाय, रेल्वेशी संबंधित विविध सेवांमध्येही हे ॲप सोय करते.

नवीन वेबसाइटचे प्रमुख फायदे : नवीन घीण्ऊण वेबसाइटमध्ये प्रगत आणि वेगवान फंक्शन्स असतील. सध्याच्या वेबसाइटपेक्षा ही अधिक आकर्षक आणि वापरकर्ता-केंद्रित असेल. प्रवाशांना तिकिट बुकिंग, सीट उपलब्धता, भाडे तपासणे, रद्द करणे आदी सर्व प्रक्रिया सहज करता येतील. अख च्या मदतीनं वैयक्तिकृत शिफारसीही मिळू शकतील. भारतीय रेल्वे ही जगातील सर्वात मोठी रेल्वे नेटवर्क्सपैकी एक आहे. दररोज लाखो प्रवासी प्रवास करतात. जुन्या सिस्टममुळं अनेकदा स्लो लोडिंग, सर्व्हर डाऊन अशा समस्या येत होत्या. नवीन प्रणालीमुळं या समस्या कमी होतील आणि प्रवाशांचा वेळ वाचेल.

# शिवसेना जिल्हा सहसंपर्क प्रमुख सी.के.मुरळीकर यांच्या अमृतमहोत्सवी दिनानिमित्त शुभेच्छांचा वर्षाव

## बोले तैसा चाले प्रमाणे जगणारा माणूस:जिल्हा संपर्क प्रमुख रोहिदास चव्हाण





**लातूर/प्रतिनिधी** : सामाजिक,धार्मिक,शैक्षणिक,सांस्कृतिक,व्यापार, बँकींग क्षेत्रातील आदर्श व्यक्तीमत्व लातूर जिल्हा शिवसेना सहसंपर्क प्रमुख सी.के.उर्फ चंद्रनाथ मुरळीकर यांचा अमृतमहोत्सवी (दि.१२ जून )दिनानिमित्त विविध क्षेत्रातील हजारो स्नेहीजनांनी हॉटेल तुलसी येथे आयोजित सदिच्छा समारंभात उपस्थित राहून तसेच अनेकांनी मोबाईलवरुन त्यांचे अभिष्टचिंतन केले.

शिवसेना जिल्हा संपर्क प्रमुख माजी आ.रोहिदास चव्हाण यांनी शुभेच्छा देताना मुरळीकर हे बोले तैसा चाले,त्याची वंदावी पाऊले या उक्तीप्रमाणे जगणारा माणूस अशा शब्दात गौरव करुन शुभेच्छा दिल्या.

यावेळी माजी आ. दिनकर माने,प्राचार्य डॉ.आर.डी.निटूरकर,यांनी यावेळी सी.के.मुरळीकर यांच्या जीवन कार्यावर प्रकाश टाकत त्यांच्यासारख्या जनमनात राहणारे व्यक्तीमत्व कार्यकर्त्यांसमोर आदर्श असलयाचे सांगून अभिष्टचिंतन केले.

सत्काराला उत्तर देताना सी.के.मुरळीकर यांनी आजपर्यंतच्या वाटचालीचा आढावा देत शिवसेनेच्या २० टक्के राजकारण आणि ८० टक्के समाजकारण,आणि हाताला काम देणारे हिंदूत्व देणाऱ्या धोरणामुळे आपण अनेक वर्षांपासून शिवसेनेत काम करतोय,पण एकदाही मातोश्रीचा दरवाजा पाहिला नाही,कारण आपल्यावर सोपविलेली जबाबदारी प्रामाणिकपणे पार पाडणे हीच पक्षनिष्ठा असल्याचे स्पष्ट केले. आपल्या आयुष्यातली ७५ वर्षे संपली पण आपल्या प्रचंड सदिच्छेमुळे आणखी समाजकार्य करण्यासाठीची उर्जा मिळाली असेही ते म्हणाले. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक राष्ट्रीय चर्मकार महासंघाचे जिल्हाध्यक्ष रवी कुरील यांनी केले.सूत्रसंचालन डॉ. नरसिंग वाघमोडे यांनी केले.इंजि.चेतन मुरळीकर यांनी आभार मानले.

याप्रसंगी शेषराव हालगरकर, माधवराव गायकवाड, समींदर वाघमारे, नवनाथ गायकवाड,चंद्रकांत सूर्यवंशी, डी.एन.शिंदे, अनिरुध्द शिंदे, शिवसेना नेते आर.एस.चव्हाण, माजी तहसीलदार मधुकर श्रंगारे, विकास मुळे, सुरज लोखंडे, सोपानराव नाबदे, डॉ.प्रवीण कांबळे, प्राचार्य कमलाकर कांबळे, राज आरनाळकर, शिवाजी दामावले, ॲड.पंडीत जाधव, ॲड. शिवकुमार जाधव, गोपाळ तावशीकर, प्रा.लामतूरे, शहाजी वळगावकर, बालजी साबळे, विभीषण सांगवीकर, भागवत दळवी, ओमकार दळवी, त्रिंबक स्वामी, बालाजी शेरखाने,हणमंत पडवळकर,शिवसेना नेते पप्पू कुलकर्णी, शिवसेना नेते संतोष सोमवंशी, अनिल कबाडे,वामन शेवाळकर,रमेश बिरादार, प्रशांत कोरे, प्रा.ओमप्रकाश झुरळे, सदानंद पवार, ॲड.राहूल मातोळकर,रोहिदास वाघमारे, सभापती सुनीता वाघमारे, डॉ.संतोष वाघमारे, लखनगावे,राष्ट्र सेवा दलाचे पांडुरंग देडे, बी.एस.पाटील,उजळंबे, पत्रकार राम जेवरे,श्रीराम संपते,बाळ होळीकर, लिंबराज पन्हाळकर, शिरीशकुमार शेरखाने,गुळवे सर,गणेश सावळकर, वैशाली कांबळे, शिवसेना उबाठा,शिंदे शिवसेना,काँग्रेस,भाजपा,वंचित बहुजन आघाडी,राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी या पक्षांसह विविध सामाजिक संस्था,संघटनांच्या पदाधिकारी,कार्यकर्ते,मित्र,स्नेही,आप्तेष्टांनी सी.के.मुरळीकर यांचा पत्नी शकुंतलासह फेटा, शाल, भरपेहराव आहेर, बुके, पुष्पहार, भेटवस्तू, ग्रंथ, सन्मानचिन्ह देवून सी.के.मुरळीकर यांना वाढदिवसांच्या शुभेच्छाचा वर्षाव केला.

# लातूर जिल्ह्यात रोजगार व असंघटित उद्योगांच्या सर्वेक्षणाला सुरुवात

## नागरिकांनी खरी माहिती देऊन सहकार्य करण्याचे आवाहन

**लातूर/प्रतिनिधी** : राज्यातील जिल्हानिहाय आकडेवारी प्राप्त होण्याच्या दृष्टीने सांख्यिकी व कार्यक्रम कार्यान्वयन मंत्रालय आणि महाराष्ट्र इन्स्टीट्यूशन फॉर ट्रान्सफॉरमेशन (मित्रा) यांच्या सहकार्याने अर्थ व सांख्यिकी आयुक्तालयामार्फत लातूर जिल्ह्यात दोन महत्त्वपूर्ण सर्वेक्षणे राबविण्यात येणार आहेत. नियतकालिक श्रमशक्ती सर्वेक्षण (पीएलएफएस) आणि असंघटित क्षेत्रातील उद्योगांचे वार्षिक सर्वेक्षण (एएसयुएसइ) अशी या सर्वेक्षणांची नावे असून, ती जून-२०२६ ते डिसेंबर-२०२६ या कालावधीत पूर्ण केली जातील.

या दोन्ही सर्वेक्षणांच्या माध्यमातून जिल्ह्यातील महत्त्वपूर्ण आर्थिक आणि सामाजिक आकडेवारी संकलित केली जाणार आहे. पीएलएफएस सर्वेक्षण याअंतर्गत रोजगार, बेरोजगारीचे प्रमाण, महिलांचा कामगारांमधील सहभाग, स्वयंरोजगार आणि असंघटित रोजगार याबाबत अद्ययावत व विश्वासार्ह आकडेवारी गोळा केली जाईल.

एएसयुएसइ सर्वेक्षणामधून उत्पादन, व्यापार आणि सेवा या असंघटित क्षेत्रांतील (बांधकाम क्षेत्र वगळून) उद्यम आस्थापनांची माहिती घेतली जाईल. यामध्ये रोजगाराचा प्रकार (पगारी/स्वयंरोजगारी), कार्यरत कामगारांची संख्या, प्रती कामगार व प्रती उद्यम स्थूल मूल्यवृद्धी, उत्पादकता आणि वेतन अशा महत्त्वाच्या आर्थिक निर्देशकांचा समावेश असेल. या संकलित माहितीच्या




आधारे राज्य आणि जिल्ह्याच्या उत्पन्नाचा अचूक अंदाज बांधणे आणि जिल्हास्तरीय विकास निर्देशांकांचे मापन करणे प्रशासनाला शक्य होणार आहे.

घरोघरी जाऊन प्रत्यक्ष माहिती गोळा करण्यासाठी अर्थ व सांख्यिकी आयुक्तालयाने इप्सॉस रिसर्च प्रायव्हेट लिमिटेड या खासगी संस्थेची निवड केली आहे. या संस्थेचे अन्वेषक आणि पर्यवेक्षक निवडक कुटुंबांना, उद्योगांना आणि व्यावसायिकांना प्रत्यक्ष भेट देतील व विहित प्रपत्रात मुलाखतीद्वारे माहिती गोळा करतील. कुटुंबातील प्रमुख व्यक्ती किंवा उद्योग प्रमुखांशी भेट होणे आवश्यक असल्याने, या कर्मचाऱ्यांना रविवार आणि सार्वजनिक सुट्टीच्या दिवशीही काम करण्याची परवानगी प्रशासनाकडून देण्यात आली आहे.

या सर्वेक्षणाद्वारे प्राप्त होणाऱ्या माहितीचा दर्जा पूर्णपणे नागरिक आणि व्यावसायिकांनी दिलेल्या सहकार्यावर अवलंबून आहे. त्यामुळे नागरिकांनी आपल्या कुटुंबाची आणि व्यवसायाची अद्ययावत व अचूक माहिती द्यावी, असे आवाहन जिल्हाधिकारी डॉ. भारत बास्टेवाड यांनी केले आहे. तसेच, कोणतीही शंका किंवा संकोच न बाळगता अन्वेषकांनी विचारलेल्या प्रश्नांची खरी माहिती देऊन राष्ट्रीय व जिल्हास्तरीय कार्यात हातभार लावावा, अशी विनंती जिल्हा नियोजन अधिकारी सोमनाथ रेड्डी आणि जिल्हा सांख्यिकी कार्यालयाचे उपायुक्त उमाकांत हत्ते यांनी केली आहे.

## शासकीय वसतिगृह प्रवेशासाठी नवीन लिंक कार्यान्वित; स्वाधार योजनेसाठीही वसतिगृहाचा अर्ज भरणे अनिवार्य

**लातूर/प्रतिनिधी** : जिल्ह्यातील सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागांतर्गत चालविल्या जाणाऱ्या शासकीय वसतिगृहांची सन २०२६-२७ या शैक्षणिक वर्षाची प्रवेश प्रक्रिया सुरु झाली आहे. यासाठी आता जुन्या वेबपोर्टलमध्ये बदल करण्यात आला असून, नवीन वेबपोर्टलवर ऑनलाईन अर्ज करण्याचे आवाहन समाज कल्याण विभागाकडून करण्यात आले आहे.

लातूर जिल्ह्यामध्ये मुलांची १४ व मुलींची १२ अशी एकूण २६ शासकीय वसतिगृहे कार्यरत आहेत. यामध्ये लातूर शहरात मुलांचे ६ तर मुलींचे ४, औसा, निलंगा, उदगीर, देवणी, आणि चाकूर येथे प्रत्येकी मुला-मुलींचे १, अहमदपूर येथे प्रत्येकी २, रेणापूर येथे मुलांचे १ आणि जळकोट येथे मुलींचे १ वसतिगृह आहे. इयत्ता ८ वी, ११ वी, बिगर व्यावसायिक पदवी/पदविका (प्रथम वर्ष), पदव्युत्तर (प्रथम वर्ष) आणि थेट द्वितीय वर्षात प्रवेश घेणारे विद्यार्थी (व्यावसायिक अभ्यासक्रम वगळून) या प्रवेश प्रक्रियेसाठी पात्र आहेत. पात्र विद्यार्थ्यांनी https://hmasnew.mahait.org या नवीन ऑनलाईन लिंकचा वापर करून आपले अर्ज सादर करावेत. शालेय विद्यार्थ्यांसाठी अर्ज करण्याची अंतिम मुदत ३० जून २०२६ असून कनिष्ठ महाविद्यालय व बिगर व्यावसायिक अभ्यासक्रमाच्या विद्यार्थ्यांसाठी मुदत १५ जुलै २०२६ पर्यंत आहे.

शासकीय वसतिगृहासाठी अर्ज करणाऱ्या अनुसूचित जाती व नवबौद्ध घटकातील पात्र विद्यार्थ्यांना, जागांअभावी वसतिगृहात प्रवेश न मिळाल्यास भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्वाधार योजनेचा लाभ ऑनलाईन पद्धतीने दिला जाणार आहे. वसतिगृह प्रवेशासाठी निवड न झालेल्या विद्यार्थ्यांचेच अर्ज स्वाधार योजनेसाठी ऑनलाईन पद्धतीने वर्ग होणार आहेत. त्यामुळे ज्या विद्यार्थ्यांनी वसतिगृह प्रवेशाचा ऑनलाईन अर्ज भरलेला नाही, अशा विद्यार्थ्यांना स्वाधार योजनेसाठी स्वतंत्र अर्ज सादर करण्याची कोणतीही सुविधा उपलब्ध असणार नाही व त्यांना या योजनेचा लाभ मिळणार नाही. तरी विद्यार्थ्यांनी प्रवेशासाठी शासनाने दिलेल्या नवीन वेब लिंकचा वापर करून विहित मुदतीत ऑनलाईन अर्ज भरावेत. तसेच, कोणतीही अडचण आल्यास स्थानिक गृहप्रमुख किंवा गृहपाल यांच्याशी संपर्क साधावा, असे आवाहन लातूरचे समाज कल्याण सहाय्यक आयुक्त यादव गायकवाड यांनी केले आहे.

# भिंगोली येथील गायरान जमिनीवरील अवैध मुरूम उत्खननाची चौकशी करा; दोषींवर कारवाईची मागणी

**लातूर/प्रतिनिधी** : मौजे भिंगोली, ता. शिरूर अनंतपाळ, जि. लातूर येथील गायरान व शासकीय जमिनीवर मोठ्या प्रमाणात अवैध मुरूम उत्खनन, वृक्षतोड तसेच पाझर तलावाच्या सांडव्याची तोडफोड करून शासनाच्या महसुलाचे लाखो रुपयांचे नुकसान करण्यात आल्याचा आरोप सामाजिक कार्यकर्ते विवेक माधवराव साळुंके व प्रा. शिवाजी महादेव एडके यांनी केला आहे.

याबाबत जिल्हाधिकारी लातूर, मुख्यमंत्री, लोकायुक्त तसेच संबंधित विभागांना निवेदन देऊन उच्चस्तरीय चौकशीची मागणी करण्यात आली आहे.

निवेदनानुसार, भिंगोली येथील गट क्रमांक १००, ११८, ११९ व १२० मध्ये परवानगीपेक्षा जास्त खोलीपर्यंत उत्खनन करण्यात आले असून गायरान गट क्रमांक ८८ मध्ये कोणतीही वैध परवानगी नसताना मोठ्या प्रमाणात मुरूम उत्खनन करण्यात आल्याचा आरोप करण्यात आला आहे. तसेच गायरान जमिनीवरील पाझर तलावाचा सांडवा तोडण्यात आला असून अनेक झाडांची तोड करून पर्यावरणाचे मोठे नुकसान करण्यात आल्याचे नमूद करण्यात आले आहे.

संबंधित प्रकरणात ५०,४५० घनमीटर मुरूम उत्खननाची परवानगी असल्याची माहिती समोर आली असली तरी शासनाकडे जमा करण्यात आलेल्या रॉयल्टीच्या रकमेत मोठी तफावत असल्याचा संशय व्यक्त करण्यात आला आहे. त्यामुळे शासनाच्या महसुलाचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाल्याची शक्यता वर्तविण्यात आली आहे.

संपूर्ण प्रकरणाची स्वतंत्र चौकशी करून प्रत्यक्ष मोजमाप करावे, अवैध उत्खननाची दंडासह रॉयल्टी वसूल करावी तसेच संबंधित कंत्राटदार व जबाबदार अधिकाऱ्यांवर फौजदारी कारवाई करावी, अशी मागणी करण्यात आली आहे.

दरम्यान, प्रशासनाने तात्काळ कारवाई न केल्यास १३ जुलै २०२६ रोजी छत्रपती संभाजीनगर येथील विभागीय आयुक्त कार्यालयासमोर धरणे आंदोलन करण्यात येईल. त्यानंतरही कार्यवाही न झाल्यास २० जुलै २०२६ रोजी पालकमंत्री तथा



सार्वजनिक बांधकाम मंत्री शिवेंद्रसिंहराजे भोसले यांच्या दालनासमोर काळ्या फिती लावून एक दिवसीय लाक्षणिक उपोषण करण्यात येईल, असा इशारा साळुंके व एडके यांनी दिला आहे.

हे पत्रक मालक, प्रकाशक, संपादक अशोक नामदेवराव हनवते यांचे करीता मुद्रक घोणे नरसिंह पांडूरंग यांनी मॅजिक पब्लीकेशन, शॉप नं. १०, मनपा शॉर्पीग कॉम्प्लेक्स, गांधी चौक, लातूर - ४१३५१२ येथे छापून कार्यालय द्रोपत माय निवास, खडक हनुमान मंदिर, मिलिंद नगर, लातूर ता. जि. लातूर ४१३५१२ येथे प्रकाशित केले.